नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## इंदूरमध्ये दूषित पाण्यामुळे १४ वा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, इंदूर, दि. १ :**
देशातील सर्वात स्वच्छ शहर इंदूरमधील भागीरथपुरा येथे दूषित पाणी प्यायल्याने आतापर्यंत १४ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. १४ व्या मृताचे नाव अरविंद (४३) वडील हिरालाल असे आहे. ते कुलकर्णी भट्टा येथील रहिवासी होते.
ते भागीरथपुरा येथे कामासाठी पोहोचले होते, तब्येत बिघडल्याने घरी परतले. यावर ते घरीच राहून औषधे घेत होते. यानंतर कुटुंबीय त्यांना एका खाजगी रुग्णालयात घेऊन गेले, जिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. सध्या दूषित पाण्यामुळे बाधित झालेले १६२ लोक रुग्णालयात दाखल आहेत.

* वर्ष ५२ * अंक १८० * * अकोला * शुक्रवार, दिनांक २ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## कर्जबाजारी देश आणि राज्ये




आपल्या देशाची अर्थव्यवस्था जपानला मागे टाकून पाचव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर आल्याचे सांगण्यात आलेले आहे. ही बाब आनंदाची आहे. त्यात अजिबात शंका नाही पण जपानची लोकसंख्या आणि आपली लोकसंख्या याची तुलना कशी करणार आहोत, हा एक वेगळा प्रश्न आहे. आपल्या देशावरील कर्ज मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे त्याचवेळी देशांतर्गत जी राज्ये आहेत त्यांच्यावरील कजार्चे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढलेले दिसते. गेल्या दशकात फुकटेगिरी म्हणजे फुकटच्या योजना आणि सबसिडी देऊन जनतेला आकर्षित करता येते हे पाहिल्यावर सर्वच राज्यांनी हा रामबाण प्रयोग सुरू केलेला आहे. महाराष्ट्रा सारख्या प्रगत राज्याचे उत्पन्न ५.६३ लाख कोटी आहे, यातून ११.५% सबसिडी आणि मोफत बियांवरती खर्च होतो. सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पेन्शन त्यासोबत व्याज यावर ५५% पेक्षा जास्त खर्च होतो, त्यानंतर मुद्दलीचे हप्ते चुकवण्यासाठी १०% च्या वर खर्च होतो. मग आता उरली ३१ टक्के राशी यामध्ये विकासासाठी अत्यंत छोट्या प्रमाणात राशी मिळते आणि त्यामुळेच की काय महाराष्ट्राने ९०० पेक्षा जास्त परियोजनांची मंजुरी रद्द केलेली आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या राज्याची तुलना करता मध्य प्रदेश, राजस्थान, बिहार, गुजरात, छत्तीसगड, हरियाणा, झारखंड आणि पंजाब यांची परिस्थिती अत्यंत घनगंभीर आहे. या कजापीटी अनेक राज्ये उणे वर्गवारीत गेलेली आहेत, त्यांचीही आकडेवारी पहा. राजस्थान जवळ उणे १६% उरतात. पंजाब जवळ उणे ७२% तर हरियाणा जवळ उणे ३० टक्के उरतात. म्हणजे या तीन राज्यांना कर्ज चुकवण्यासाठी पुन्हा कर्ज घ्यावे लागते, ही सत्यस्थिती आहे. मध्य प्रदेश सारख्या राज्याने निवडून येण्यासाठी कर्ज काढून लाडक्या बहिणीच्या पदरात रक्कम टाकली आणि त्याचे इतर ठिकाणी अनुकरण झाले. पंचवीस तीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रा सारख्या राज्याचा अर्थसंकल्प शिलकी होता. सध्य घडीला देशातील सर्वच राज्यांवर मोठ्या प्रमाणावर कर्ज आहे. कोणतेही सरकार फुकटेगिरीची योजना मग ती कोणतीही असो, अशी कुठलीच योजना अजिबात बंद करायला धजावत नाही. देशातील एक दोन राज्यांनी थोडेबहुत प्रयत्न केल्याचा अहवाल आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा या राज्यांच्या तुलनेत आज महाराष्ट्र जरासा बरा दिसत आहे परंतु, सरकारची उदारता अशीच ओथंबून किंवा ओसंडून वाहत राहिली तर भविष्यकाळात आपलीही अवस्था पंजाब किंवा हरियाणा सारखी होऊ शकते. वर उल्लेख केलेल्या तिन्ही राज्यांच्या जीडीपी पेक्षा त्यांच्यावरील कर्जाचे प्रमाण एक तृतीयांश पेक्षाही जास्त आहे. अर्थव्यवस्थेतील चौथ्या क्रमांकाची गोष्ट करताना या गोष्टीही लक्षात ठेवल्या पाहिजेत. तरीही गंमत अशी आहे की याबद्दल कोणालाही काळजी वाटत नाही. धडाधड कर्ज घेणे, फुकटे गिरीच्या योजना राबवणे आणि सत्ता मिळवणे हा आता राजधर्म झालेला दिसतो. हे आकडे जेव्हा आम्ही मिळवले तेव्हा आमचे डोळे पांढरे झाले. पहिले कर्ज फेडण्यासाठी, दुसरे कर्ज घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याला आपली किडनी विकावी लागली. त्याप्रमाणेच आपल्या देशातील राज्यांच्या किडनींचा शोध लावल्यास हे कर्ज अनेक राज्यांना किडनी शून्य करू शकते की नाही हे ठरवावे लागेल. आम्हाला पुढच्या सरकारांचे भविष्य अंधकारमय वाटते म्हणून आमचा हा आजचा प्रपंच आहे. वरिष्ठ पातळी वरूनच या कर्ज व्यवहाराची भयानकता गंभीरपणे विचारात घेऊन पावले उचलणे गरजेचे ठरणार आहे. पण... हिम्मत होईल काय?

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## भाजपसह शिवसेनेचीही विजयाची
# घोडदौड सुरू!

### कल्याण-डोंबिवली महापालिकेत ९, तर राज्यभरात १३ नगरसेवक बिनविरोध

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर / मुंबई, दि. १ :**



राज्यात सध्या महापालिका निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या नाट्यातून पुढे येत आता अर्जांची छाननी केली जात असून यात राजकीय पक्ष एकमेकांना धक्के देत आहेत. तर काही ठिकाणी बिनविरोध विजयाचे गुलाल उधळण देखील सुरू झाली आहे.

भाजपने कल्याण डोंबिवलीमध्ये विजयाचा गुलाल उधळल्यानंतर आता केडीएमसी महापालिकेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या युतीचे तब्बल ९ नगरसेवक विजयी झाले आहेत. भाजपचे ५ आणि शिवसेना शिंदे गटाचे ४ उमेदवार बिनविरोध झाले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत भाजप-शिवसेना शिंदे गटाच्या महायुतीने मतदानापूर्वीच विजयाचा गुलाल उधलण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे ५ आणि शिवसेना शिंदे गटाचे ६ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १२२ सदस्य संख्या असलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेल्या ६२ जगांपासून महायुती आता केवळ ५३ जागा दूर आहे. त्यामुळे भाजप, शिवसेनेत जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून येत असल्याने भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची रणनीती यशस्वी ठरत असल्याचे बोलले जात आहे. मात्र, आता शिवसेना शिंदे गटाचेही ४ उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांची खेळी यशस्वी झाली असल्याचे पाहायला मिळत आहे.

कल्याण डोंबिवली महानगर पालिका निवडणुकीत मतदान होण्यापूर्वीच भाजपची विजयी घोडदौड सुरू झाली आहे. रेखा चौधरी, आसावरी नवरे, रंजना पेंकर, मंदा पाटील यांच्यासह आता ज्योती पवन पाटील या २४ ब मधून बिनविरोध निवडून आल्या आहेत. ज्योती पवन पाटील यांच्यामुळे बिनविरोध निवडून येणाऱ्या भाजप उमेदवारांची संख्या आता ५ वर पोहोचली आहे. याचे श्रेय रवींद्र चव्हाण यांच्या रणनीतीला दिले जात आहे.

**शिवसेना शिंदे गटाचेही वर्चस्व**

कल्याण डोंबिवलीमध्ये शिवसेना शिंदे गटाकडून पॅनल क्र. २४ मधून रमेश म्हात्रे, विश्वनाथ राणे, वृषाली रणजित जोशी तर प्रभाग क्र. २८ अ मधून हर्षल राजेश मोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. आमदार राजेश मोरे यांचे हर्षल मोरे हे चिरंजीव आहेत. येथील सर्व अपक्ष उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर या निवडणुका बिनविरोध झाल्या. तसेच याचे श्रेय खासदार श्रीकांत शिंदे यांना दिले जात आहे.

कल्याण डोंबिवलीसह राज्यभरातही महायुतीची घोडदौड सुरूच असल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपने धुळे महानगरपालिकेत २, पनवेल महानगरपालिकेत १ जागा बिनविरोध करत, राज्यात ८ जागांवर बिनविरोध उमेदवार विजयी केले आहेत. तर शिवसेना शिंदे गटाने केडीएमसीत ४, जळगावमध्ये १ जागा बिनविरोध करत राज्यभरात ५ जागा बिनविरोध केल्या आहेत. दुसरीकडे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची अहिल्यानगरमध्ये एक जागा बिनविरोध निवडून आली आहे. त्यामुळे राज्यात भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीच्या एकूण १३ जागा बिनविरोध झाल्या असल्याचे दिसून येत आहे.

## व्यावसायिक सिलिंडर १११ ने महाग

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :**
आज १ जानेवारी २०२६ पासून व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किमती ११ रुपयांनी वाढल्या आहेत. तसेच, कार खरेदी करण्यासाठीही तुम्हाला जास्त किंमत मोजावी लागेल.



आजपासून १९ किलोचा व्यावसायिक गॅस सिलेंडर १११ रुपयांपर्यंत महाग झाला आहे. दिल्लीत त्याची किंमत १११ रुपयांनी वाढून १६९१.५० झाली आहे. आधी तो १५८०.५० मध्ये मिळत होता. तर मुंबईत तो आता १६४२.५० रुपयांना मिळेल.

## शिंदेंसेनेतही 'घराणेशाही'

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १ :**
मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय पक्षांनी दिलेल्या उमेदवारीमुळे 'घराणेशाही'चा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, ज्या 'घराणेशाही'वरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सातत्याने ठाकरे गटावर सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले म्हणून टीका करतात, त्यांच्याच पक्षात आता घराणेशाहीचे मोठे पीक आल्याचे पाहायला मिळत आहे. मुंबईतील तब्बल ८ महत्त्वाच्या जागांवर शिंदे गटाने आमदार आणि खासदारांच्याच वारसांना मैदानात उतरवले आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत तिकीट वाटपावरून नवा वाद रंगला आहे. भाजपने नांदेडमधील लोहा नगरपालिकेत एकाच घरातील ६ जणांना उमेदवारी दिल्यानंतर टीकेची झोड उठली होती. मात्र, आता भाजपने सावध पवित्रा घेत 'आमदार-खासदारांच्या मुलांना तिकीट नाही' असा पवित्रा घेतला आहे. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने याउलट पाऊल टाकत चक्क ८ आमदार-खासदारांच्या कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी दिली आहे.

शिंदे गटाने जाहीर केलेल्या उमेदवारी यादीत आमदार आणि खासदारांच्या नातेवाईकांचा भरणा दिसून येत आहे. यामध्ये कन्या, पुत्र, पत्नी आणि सुनांनाही संधी देण्यात आली आहे.

# ऐतिहासिक भूमीत अक्षरांचा जागर

■ **सातारच्या ऐतिहासिक भूमीतून थेट अजित जगताप**

असं म्हणतात की, इतिहास मनगटांच्या रगीमधून लिहिला जातो, इतिहास काळजाच्या धगी मधून लिहिला जातो. धर्म, जात, प्रांत, पंथ यांना गाडून विश्वबंधुत्वाचा इतिहास सांगणाऱ्या संतांच्या अनमोल वाणीला स्मरून इतिहास रचणारा सातारा जिल्हा आहे. थेट छत्रपती शिवरायांची गादी साताऱ्यामध्ये आहे. आज या साताऱ्यात ठिकाणी साहित्यिकांची मंदियाळी अवतरली.

## ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा दिमाखदार शुभारंभ
### ग्रंथदिंडीने जागवल्या पारंपारिक आठवणी

■ **सातारा, दि. १ :**
ऐतिहासिक सातारा नगरीत आज साहित्य आणि विचारांच्या अभूतपूर्व संगमातून ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा शुभारंभ झाला. 'स्वराज्य विस्तारक छत्रपती थोरले शाहू महाराज साहित्यनगरी' (शाहू क्रीडा संकुल) येथे ध्वजारोहणाच्या मंगल सोहळ्याने या साहित्यकुंभाचा शुभारंभ झाला.









सातारा जिल्ह्याचे वैभव आणि साहित्याची परंपरा यांचा अनोखा संगम आज या ठिकाणी पाहायला मिळाला. महाराष्ट्र साहित्य परिषदे, पुणे, शाखा-शाहूपुरी (सातार) आणि मावळा फौंडेशन, सातारा आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या वतीने सातारा येथे १ ते ४ जानेवारील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येथे सातारा येथे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते संमेलनाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या ऐतिहासिक प्रसंगी ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कार्यवाहक सुनीताराजे पवार, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, ज्येष्ठ उद्योजक भालचंद्र जोशी, संदीप शहा, रवींद्र बेडकीहाळ यांसह अनेक साहित्यिक, मान्यवर, अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**विविध 'कट्ट्यांचा' उत्साह**

संमेलनाचे मुख्य आकर्षण असलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन ९८ व्या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. हजारो पुस्तकांनी सजलेली ही ग्रंथनगरी वाचकांसाठी ज्ञानाचा खजिना ठरत आहे. साहित्याच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या विविध कट्ट्यांचे उद्घाटनही यावेळी करण्यात आलेः

कवी कट्ट्याचे उद्योजक भालचंद्र जोशी यांच्या हस्ते व रवींद्र बेडकीहाळ यांच्या उपस्थितीत तर गझल कट्ट्याचे उद्घाटन समंलनाचे स्वागत अध्यक्ष श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. प्रकाशन कट्ट्याचे उद्घाटन संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते झाले.

**सातारकर पाहुणचारासाठी सज्जः शिवेंद्रसिंहराजे भोसले**

स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले, सातारकरांच्या वतीने सर्वांचे स्वागत केले. ते म्हणाले, साहित्यातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांच्या स्वागतासाठी सातारकर सज्ज आहेत. स्वागताची कोणतीही उणीव भासू नये, यासाठी प्रशासन आणि आम्ही सर्वजण मनोभावे प्रयत्न करत आहोत. हे संमेलन सातारच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे ठरेल.

**संमेलनासाठी सातारकरांमध्ये मोठा उत्साह : विश्वास पाटील**

यावेळी संमेलनाचे अध्यक्ष पाटील म्हणाले, या साहित्य संमेलनासाठी सातारकरांमध्ये मोठा उत्साह आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साहित्य आणि रसीक मंडळी आलेली आहेत. त्यांचा उत्साह पाहून आम्हाला अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळते. साहित्यशारदेच्या या उत्सवात सातारा आणि आजुबाजूच्या जिल्ह्यांमधील, संपूर्ण महाराष्ट्रातील साहित्यीक, रसिक मोठ्या प्रमाणावर सहभागी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संमेलनाचे कार्याध्यक्ष कुलकर्णी म्हणाले, आज अत्यंत उत्साहात ध्वजारोहणासह विविध कार्यक्रमांनी संमेलनाचा शुभारंभ झाला आहे. आत्तापर्यंतच्या सर्व साहित्य संमेलनांमध्ये हे साहित्य संमेलन अधिक उठावदार ठरेल.

सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांनी स्वागतामध्ये कुठेही कमी पडणार नाही असा शब्द दिला होता. त्याप्रमाणे महामंडळानेही हे मान्य केले आहे. अत्यंत दजेर्दार आणि उच्च प्रतिची अशी व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रशासनाने खूप सहकार्य केले आहे.

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या ग्रंथ दिंडीने महाराष्ट्र राज्याची संस्कृती परंपरा संत वाङ्मय आणि साहित्य यांच्या आठवणी निश्चितपणे जागवल्या. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे स्वागत अध्यक्ष सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, अखिल भारतीय महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, कार्यवाह सुनीताराजे पवार, कर्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, मसाप शाहूपुरी शाखेचे अध्यक्ष नंदकुमार सावंत, मावळा फाउंडेशनचे अध्यक्ष शरद बेबले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. श्रीफळ वाढवून ग्रंथ दिंडीचे उद्घाटन करण्यात आले.

राजवाडा येथून ग्रंथ दिंडीची सुरुवात झाली. या ग्रंथ दिंडीला स्वतः शिवेंद्रसिंहराजे भोसले मिलिंद जोशी यांनी खांदा दिला. सातारा शहरातून या ग्रंथदिंडी राजपथ ते पोवई नाका तेथून पोलीस कवायत मैदान मार्गे श्रीमंत छत्रपती थोरले शाहू महाराज साहित्य नगरी कडे मार्गस्थ झाली

तत्पूर्वी स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, संमेलन अध्यक्ष विश्वास पाटील,अखिल भारतीय मराठी महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी यांची चांदीच्या रथातून मिरवणूक काढण्यात आली.

या ग्रंथदिंडीमध्ये ५५ शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. पर्यावरण, साताऱ्यातील पर्यटन, संत साहित्य, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व थोर समाज सुधारक महात्मा फुले यांची शिक्षण चळवळ,सं त ज्ञानेश्वर, मुक्ताबाई यांनी केलेला संतपरंपरेचा प्रसार अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी आकर्षक चित्र सादर केले.

## भीमा कोरेगावमध्ये लाखोंची गर्दी
### अजित पवार-प्रकाश आंबेडकरांचे अभिवादन

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :**
भीमा कोरेगाव येथे आज १ जानेवारी रोजी २०८ वा शौर्य दिन अत्यंत उत्साहात आणि अभूतपूर्व गर्दीत साजरा होत आहे. ऐतिहासिक विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून लाखो भीम अनुयायी पहाटेपासूनच भीमा कोरेगावमध्ये दाखल झाले आहेत.




ढोल-ताशे, जयघोष आणि निळ्या झेंड्यांच्या साक्षीने परिसरात चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शौर्यदिनाच्या निमित्ताने सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक संदर्भांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या शौर्यदिनानिमित्त उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी भीमा कोरेगाव येथे उपस्थित राहून विजयस्तंभाला अभिवादन केले. यावेळी त्यांनी प्रशासनाच्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले. मी आज येथे अभिवादनासाठी आलो आहे. प्रशासनाने अतिशय चांगली तयारी केली असून आवश्यक सर्व निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. दुपारनंतर गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे, त्यासाठीही नियोजन करण्यात आले आहे, असे अजित पवार म्हणाले. शौर्यदिन शांततेत आणि सुव्यवस्थितपणे पार पडावा, यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही विजयस्तंभाला अभिवादन केले. यावेळी त्यांनी भीमा कोरेगावच्या ऐतिहासिक लढ्याचे महत्त्व अधोरेखित केले. हा लढा केवळ सैनिकी विजय नव्हता, तर जातीप्रथा आणि अन्यायकारक व्यवस्थेविरोधातील संघर्ष होता, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले. प्रशासनाने उभारलेल्या सुविधा आणि एकूण नियोजन पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. भीमा कोरेगावचा शौर्यदिन हा सामाजिक न्यायाच्या लढ्याचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

शौर्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेकडून एकूण २३ आरोग्य केंद्रे उभारण्यात आली असून, ४३ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय १८ खासगी रुग्णालयांतील २८६ खाटा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. आरोग्य सेवेसाठी १५५ प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे. भाविकांच्या सोयीसाठी उपहारगृह आणि पाण्याच्या टँकरसाठी ३३ तपासणी पथके कार्यरत आहेत.

स्वच्छता आणि पाणीपुरवठ्यासाठीही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ८० घंटागाड्या, शुद्ध पाण्यासाठी १५० टँकर्स तैनात असून,२०० कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

## मोदींचा सूचक दौरा
## शाह, योगींच्या सभा
### रणांगणात भाजपच्या तोफा धडाडणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
महापालिकेच्या रणांगणात आता रणशिंग फुंकलं जाणार आहे. मुंबईसह राज्यातील प्रमुख महानगरपालिकांसाठी भाजपने आखलेला प्रचाराचा मेगाप्लॅन अंतिम टप्प्यात पोहोचला असून, येत्या काही दिवसांत राजकीय वातावरण अक्षरशः तापणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजप आक्रमक प्रचारात उतरणार असून, दिल्लीपासून लखनौपर्यंतचे दिग्गज नेते मैदानात दिसणार आहेत.

या प्रचार रणनितीचा केंद्रबिंदू असतील केंद्रीय गृहमंत्री आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री . त्यांच्या ज्वालाग्राही भाषणांच्या तोफा महापालिकेच्या लढतीत भाजपसाठी निर्णायक ठरणार असल्याचा दावा पक्षात केला जात आहे.

विशेष बाब म्हणजे पंतप्रधान यांची थेट प्रचारसभा होणार नसली, तरी त्यांचा मुंबई दौरा राजकीय दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. ११ जानेवारी रोजी मुंबईत दाखल होणारे पंतप्रधान एका विशेष कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. पद्मभूषण पुरस्कारप्राप्त यांच्या ५००व्या पुस्तकाचे प्रकाशन पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. या माध्यमातून जैन समाजात सकारात्मक संदेश पोहोचवण्याची भाजपची रणनीती असल्याचं बोललं जात आहे.

## अखेर महायुतीला रामदास 'आठवले'!

### भाजप-शिंदेसेना प्रत्येकी ६ जागा सोडणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातच जागावाटप झाल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले गट) नेते रामदास आठवले नाराज झाले होते. मात्र, या नाराजीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रिपाइंला सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे.

महायुतीतील दोन्ही मोठे भाऊ आपल्या कोट्यातून प्रत्येकी ६ जागा रिपाइंला देणार असून, आता मुंबईत रिपाइं १२ जागांवर महायुतीचा घटक म्हणून लढेल.



मुंबईत भाजप-शिवसेना युतीतील जागावाटपात स्थान न मिळाल्याने रामदास आठवले यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यांनी रिपाइं पक्षाचे ३९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. यानंतर त्यांनी 'वर्षा' बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि त्यानंतर ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही सविस्तर चर्चा केली.

या भेटीनंतर दोन्ही नेत्यांनी रिपाइंला प्रत्येकी ६ जागा देण्याचे आश्वासन दिले. आम्ही महायुतीचा भाग आहोत आणि आता १२ जागांवर आमचे उमेदवार निवडणूक लढवतील, असे आठवले म्हणाले. रिपाइंच्या प्रवेशानंतर आता भाजपा १३१, शिवसेना ८४ आणि रिपाइं १२ असे जागा वाटपाचे गणित असणार असल्याचे समोर आले आहे.

# ज्यांनी भाजपचे घर बांधले... तेच आज बेघर!



■ **मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून राजकारणात सुरू असलेल्या गोंधळाचा समाचार घेताना सुषमा अंधारे यांनी महायुतीवर बोचरी टीका केली आहे. कुणी आत्मदहनाचा प्रयत्न करतंय, कुणी एबी फॉर्म खाऊन टाकतंय, तर कुणी नेत्यांच्याच कानशिलात लगावतंय. ही परिस्थिती पाहता भाजप आता फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे विधान अंधारे यांनी केले.

सुषमा अंधारे यांनी भाजपच्या सद्यस्थितीची तुलना इतिहासातील काँग्रेसशी केली. जेव्हा एखादा पक्ष अतिशक्तीशाली होतो आणि महत्त्वाकांक्षा वाढतात, तेव्हा त्यातूनच नवे पक्ष जन्माला येतात. भाजपमध्ये नाशिकच्या देवयानी फरांदे असोत किंवा सुधीर मुनगंटीवार यांची नाराजी; हे सर्व आलबेल नसल्याचे लक्षण आहे. ज्या निष्ठावंतांनी वर्षानुवर्षे मेहनत करून भाजपचे घर बांधले, त्यांनाच आज बाहेरून आलेल्या 'उपऱ्यां'साठी घराबाहेर काढले जात आहे, असा टोला सुषमा अंधारे यांनी लगावला.

दुसरीकडे, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेत अशी परिस्थिती नसल्याचा दावा अंधारे यांनी केला. आम्ही पुण्यात ८० ते ८५ जागांवर लढत आहोत. जिथे एकापेक्षा अधिक इच्छुक होते, त्यांना सन्मानाने 'मातोश्री'वर बोलावून त्यांची समजूत काढण्यात आली आणि मार्ग काढला गेला. आमच्याकडे बंडखोरीचे चित्र नाही, असे त्या म्हणाल्या.

अजित पवार गटाने गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांना दिलेल्या उमेदवारीवर अंधारे यांनी 'वाण नाही पण गुण लागला' या म्हणीचा आधार घेत टीका केली. त्या म्हणाल्या, अजित पवारांनी ज्या भाजपशी घरोबा केला आहे, तिथे आधीच भ्रष्ट, तडीपार आणि गुन्हेगार भरलेले आहेत. भाजप सोबत असेल तर गुन्हेगारांनाही निवडून आणता येते, ही खात्री पटल्यामुळेच अजित पवारांनी गुन्हेगारांना उमेदवारी देण्याचे धाडस केल्याचे त्या म्हणाल्या.

# राजकीय पक्षांची डोकी ठिकाणावर आहेत का?



■ **पुणे :** महानगरपालिका निवडणुकांमध्ये स्वच्छ प्रतिमेचे उमेदवार देण्याऐवजी राजकीय पक्षांनी गुन्हेगारी टोळ्यांशी संबंधित व्यक्तींच्या पत्नींना आणि चक्क तुरुंगात असलेल्या आरोपींना उमेदवारी दिल्याने खळबळ उडाली आहे. या प्रवृत्तीचा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तीव्र निषेध केला असून, राजकीय पक्षांची डोकी ठिकाणावर आहेत का? गुंड प्रवृत्तीच्या लोकांशी संबंधित व्यक्ती जनतेच्या हिताची कामे करतील का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

पुण्यातील कुख्यात गुंडांच्या टोळीतील तीन सदस्यांनी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे एबी फॉर्म भरून उमेदवारी दाखल केली आहे. केवळ राष्ट्रवादीच नाही, भाजपकडूनही अपहरण, खंडणी आणि गोळीबाराचे आरोप असलेल्या गुंडाच्या पत्नीला उमेदवारी देण्यात आली आहे. हे प्रकरण महापालिका निवडणुकीत चांगलेच तापण्याची शक्यता असून, अंजली दमानिया यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत संताप व्यक्त केला आहे. .

अंजली दमानिया यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसवर निशाणा साधला. पुण्याच्या राजकारणात दहशत असलेल्या आंदेकर कुटुंबातील दोन महिलांना पक्षाने तिकीट दिले आहे, ज्या सध्या तुरुंगात आहेत. त्या जेलमधून या सोयी नागरिकांना कशा काय पुरवणार आहेत? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला.

नगरसेवक हा जनतेचा प्रतिनिधी असतो. कचरा व्यवस्थापन, गटारांची साफसफाई, प्राथमिक शिक्षण, दवाखाने, खेळाची मैदाने अशा मूलभूत सुविधा नागरिकांना देणे हेच नगरसेवकाचे काम आहे. मात्र अजित पवार गटाने तुरुंगात असलेल्या दोन महिलांना तिकीट दिले आहे. तुरुंगातून त्या मूलभूत सुविधा, ह्या बायका कशा देणार आहेत? असा सवाल अंजली दमानिया यांनी केला.

# शिंदे गटाला जोरदार झटका

■ **अहिल्यानगर** अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत सर्वाधिक ५४ जागा लढवणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेला जबर झटका बसला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांनी उमेदवार अर्जाच्या छाननीत ५ उमेदवारांचे अर्ज बाद ठरवलेत. या उमेदवारांना अनुमोदकाची चुकीची स्वाक्षरी, एबी फॉर्मवरील खाडाखोड, अजासोबत झेरॉक्स प्रत जोडणे आदी चुका भोवल्या आहेत.

अर्जांच्या छाननीत सत्ताधारी शिंदे गटाच्या ५ उमेदवारांचे अर्ज बाद ठरले. यापैकी एक अर्ज अनुमोदकाची चुकीची स्वाक्षरी असल्याने बाद झाला. तर इतर ४ अर्ज एबी फॉर्म न जोडणे, एबी फॉर्मची झेरॉक्स प्रत जोडणे व जोडलेल्या एबी फॉर्मवर खाडाखोड करणे आदी कारणांमुळे बाद ठरवण्यात आले. यामुळे महापालिकेच्या ५४ जागा लढवणाऱ्या शिंदे गटाचा आकडा ४९ वर घसरला आहे. विशेष म्हणजे बहुतांश प्रभागांतील उमेदवारांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या अर्जांवर विविध आक्षेप नोंदवले. या तक्रारींची पडताळणी केली. त्यात ज्या तक्रारींमध्ये तथ्य आढळले ते अर्ज अवैध ठरवण्यात आले.

# फडणवीसांच्या सभांचा झंझावात!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीसाठी हजारो उमेदवार रिंगणात आहे. भाजपने प्रत्येक महानगर पालिकेत आपले उमेदवार उतरवले आहेत. त्यामुळे आता लवकरच प्रचाराला सुरूवात होणार आहे.

या निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभा गेमचेंजर ठरणार आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढील काही दिवसांमध्ये अंदाजे ४० ते ४५ सभा घेणार आहेत. प्रत्येक महानगरपालिकेसाठी फडणवीस सभा घेणार असल्याची माहिती समोर आली आहे.

माहितीनुसार, मोठ्या महानगरपालिकांमध्ये मुख्यमंत्री फडणवीस अंदाजे तीन ते चार सभा घेणार आहेत, तर लहान महानगरपालिकांमध्ये प्रत्येकी एक सभा घेतली जाणार आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नवी मुंबई, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यासारख्या बड्या शहरांमध्ये दोनपेक्षा जास्त सभांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

याआधी झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठ्या प्रमाणात सभा घेतल्या होत्या. आता महानगरपालिका निवडणुकीतही ते पायाला भिंगरी लावून प्रचार करणार आहे. ते दररोज ३-४ सभा घेण्याची शक्यता आहे. यामुळे



आगामी निवडणुकीत भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक वेळापत्रकानुसार, ३ जानेवारीपासून महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार सुरू होणार आहे. १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. त्यामुळे पुढील १२-१३ दिवसांमध्ये फडणवीसांसह इतर प्रमुख नेत्यांच्या सभांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्यासोबत अन्य महत्वाचे नेतेही या सभांना संबोधित करणार असल्याची माहिती आहे.

## बंडोबांना थंड करण्यासाठी स्वतः मुख्यमंत्री मैदानात; फॉर्म्युल्याची चर्चा

सरत्या वर्षभरात भाजपमधील बंडोबांच्या नाराजीने राज्याचं राजकारण अक्षरशः ढवळून निघालं. निष्ठावंतांचा आक्रोश, संतापाचे टाहो, आंदोलनांची धार–कुठे अन्नत्याग, कुठे मंत्रिमहोदयांच्या वाहनांना घेराव, तर कुठे भावनावेग अनावर होऊन घडलेले नाट्यप्रसंग. या साऱ्या घडामोडींनी पक्ष नेतृत्वालाही गांभीर्यानं विचार करायला लावलं. अखेर या अस्वस्थतेची थेट दखल घेतली ती मुख्यमंत्री यांनी.

राज्यातील प्रमुख शहरांमधील बंडखोरांशी थेट संवाद साधत मुख्यमंत्री स्वतः डॅमेज कंट्रोल मोडमध्ये उतरल्याची माहिती सूत्रांकडून समोर येते. निवडणुकीच्या रणधुमाळीत माघार घेण्याबाबत अनेक अपक्ष उमेदवारांशी मुख्यमंत्र्यांचा थेट संवाद झाल्याचं सांगितलं जात आहे. बंडखोरी शमवण्यासाठी काहींना राजकीय पुनर्वसनाचा शब्द देण्यात आला असून, तर काहींची जबाबदारी स्थानिक नेत्यांवर सोपवण्यात आली आहे.

स्थानिक पातळीवर चित्र अधिक नाट्यमय आहे. बंडखोरांच्या घराघरांत पक्षाचे नेते पोहोचत असून, पक्षशिस्त, संयम आणि दीर्घकालीन राजकारण याची आठवण करून दिली जात आहे. काही ठिकाणी कुटुंबीयांशी संवाद साधत भावनिक दुवा घट्ट करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर गोरेगाव विधानसभा मतदारसंघात भाजपने महत्त्वपूर्ण यश मिळवलं आहे. मुंबई भाजपा अध्यक्ष यांच्या मध्यस्थीमुळे अपक्ष उमेदवार यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

प्रभाग क्रमांक ५४ मध्ये इच्छुक असतानाही सर्वेक्षणात नाव असूनदेखील उमेदवारी न मिळाल्याने संदीप जाधव नाराज झाले होते. उमेदवारी नाकारल्यानंतर त्यांनी पक्षाला रामराम ठोकत अपक्ष उमेदवारी दाखल केली. मात्र, अमित साटम यांच्या भेटीनंतर चित्र बदललं.

भविष्यात मुंबई भाजपा कार्यकारिणीत स्थान देण्याचं आणि सन्मान जपण्याचं आश्वासन देत, देवा भाऊंच्या नेतृत्वाखाली मुंबईत भगवा फडकवूया असा भावनिक साद घातल्याचं समजतं.

# किरीट सोमय्यांच्या लेकाचा विजय जवळपास निश्चित

## उबाठा सेना-मनसेचा उमेदवारच नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याविरोधात भाजपकडून सर्वात आक्रमक भूमिका कुणी घेतली असेल, तर ते नाव म्हणजे किरीट सोमय्या. ठाकरे कुटुंबाशी थेट भिडणारे, आरोपांच्या फैरी झाडणारे आणि आघाडी सरकारविरोधात जणू मोहीमच उघडणारे किरीट सोमय्या एकटेच होते, असे म्हणावे लागेल.

त्यामुळेच मुंबई महापालिका निवडणुकीत ठाकरे विरुद्ध सोमय्या असा थेट सामना पुन्हा पाहायला मिळेल, अशी चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली होती. मात्र, प्रत्यक्षात हा सामना होणारच नाही, हे आता स्पष्ट झाले आहे आणि तेही अत्यंत नाट्यमय पद्धतीने.

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि यांनी एकत्र येत कंबर कसली आहे. त्यांच्या विरोधात भाजपझशिवसेना युतीनेही तगडे आव्हान उभं केलं आहे. त्यामुळे प्रत्येक प्रभाग निर्णायक ठरत असताना, मुलुंडमधील प्रभाग क्रमांक १०७ अचानक चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. या प्रभागातून भाजपने नील सोमय्या यांना उमेदवारी दिली आहे. नील हे किरीट सोमय्या यांचे पुत्र. त्यांच्या विरोधात ठाकरे गट, मनसे किंवा महाविकास आघाडीकडून एखादा तगडा उमेदवार उतरवला जाईल, अशी अटकळ होती. मात्र, ती पूर्णपणे फोल ठरली.

खुद्द किरीट सोमय्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली. उद्धव ठाकरे यांची शिवसेना (यूबीटी), राज ठाकरे यांची मनसे, यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस–या कुणाचाही उमेदवार प्रभाग क्रमांक १०७ मधून रिंगणातच नाही.

विशेष म्हणजे, मुलुंडमधील इतर प्रभागांत ठाकरे बंधू, राष्ट्रवादी किंवा काँग्रेसचे उमेदवार मैदानात आहेत. मात्र, प्रभाग १०७ हा महाविकास आघाडीत राष्ट्रवादीच्या वाट्याला गेला होता. त्या ठिकाणी हंसराज दनानी यांना उमेदवारी देण्यात आली होती. पण तांत्रिक कारणांमुळे त्यांचा उमेदवारी अर्ज अवैध ठरला–आणि संपूर्ण गणितच उलटलं.

सध्या या प्रभागात तब्बल ९ अपक्ष उमेदवार रिंगणात आहेत. मात्र, कोणत्याही प्रमुख पक्षाचा उमेदवार नसल्याने नील सोमय्या यांचे पारडे जड मानले जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, अशा परिस्थितीत त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

हा मतदारसंघ भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला मानला जातो. किरीट सोमय्या हे स्वतः या भागाचे माजी खासदार राहिले आहेत. त्यामुळे संघटनात्मक ताकद, मतदारांचा कल आणि विरोधकांची अनुपस्थिती–या तिन्ही गोष्टी नील सोमय्यांच्या बाजूने जाताना दिसत आहेत. ठाकरे बंधू, शरद पवार किंवा काँग्रेसकडून आता वंचित किंवा एखाद्या अपक्ष उमेदवाराला छुपा पाठिंबा दिला जाणार का? की नील सोमय्या यांना मोकळं मैदान देत हा प्रभाग भाजपच्या पारड्यात टाकला जाणार? या एका प्रभागातील घडामोडी मुंबईच्या राजकारणातील अनपेक्षित वळण ठरत असून, लढतच न होता विजय? असा प्रश्न विचारला जात आहे.

# राहुल गांधींचे काम प्रभू रामचंद्रांसारखेच

## नाना पटोलेंकडून तुलना : शिंदेसेनेचा पलटवार



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :** काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या कार्याची तुलना प्रभू श्रीरामांच्या कार्याशी केल्याने राज्याच्या राजकारणात एक नवा वाद निर्माण झाला आहे.

प्रभू रामचंद्रांचे काम शोषित व पीडितांची सेवा करणे व त्यांना न्याय मिळवून देण्याचे होते. राहुल गांधी तेच काम करत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानावर सत्ताधारी शिवसेनेने तीव्र आक्षेप घेत काँग्रेसवर निशाणा साधला आहे. राहुल गांधींची तुलना रामाशी करणे अत्यंत हास्यास्पद आहे. काँग्रेस हा पक्षच मुळात रामविरोधी आहे, असे संजय निरुपम यांनी म्हटले आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अयोध्येत जाऊन अद्याप श्रीरामाचे दर्शन घेतले नाही. पत्रकारांनी याविषयी नाना पटोले यांनी छेडले असता त्यांनी राहुल गांधी हे श्रीरामासारखेच काम करत असल्याचे स्पष्ट केले. प्रभू श्रीराम सर्वांच्याच मनात असतात. प्रत्येकाच्या विचारांत असतात. शोषित व पीडित लोकांची सेवा करणे, त्यांना न्याय मिळवून देणे हेच त्यांचे काम होते.

राहुल गांधी तेच काम करत आहेत. राहुल गांधी प्रभू श्रीरामाच्याच आदर्शांनुसार वाटचाल करत आहेत. त्यामुळे प्रभू रामाला केवळ मंदिरापर्यंत मर्यादित ठेवता कामा नये. त्यांचे विचार व कर्म अत्यंत महत्त्वाचे आहेत, असे पटोले म्हणाले. राहुल गांधी अयोध्येच्या दौऱ्यावर जातील तेव्हा ते जरूर रामलल्लांचे दर्शन घेतील. कारण, राहुल यांचे वडील राजीव गांधी यांनीच रामलल्ला मंदिराचे कुलूप उघडले होते हे सर्वश्रुत आहे.

दुसरीकडे, संजय निरुपम यांनी नाना पटोलेंचे विधान अत्यंत हास्यास्पद असल्याचे म्हटले आहे. काँग्रेस हा पक्षच मुळात रामविरोधी आहे. अयोध्या हे श्रीरामाचे जन्मस्थान आहे. तेथील रामजन्मभूमी मंदिराला काँग्रेसने नेहमीच विरोध केला. तिथे मंदिर होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे निरूपम म्हणाले.

# मुंबईसह राज्यात 'ठाकरें'ची तोफ धडाडणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :** मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले असून, आता प्रचाराच्या 'धुमाळी'ला सुरुवात होत आहे. यंदाची निवडणूक ही राज्याच्या राजकीय इतिहासात वेगळी ठरणार आहे, कारण उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे पहिल्यांदाच युती करून निवडणूक मैदानात उतरले आहेत. येत्या सोमवारपासून (५ जानेवारी) ठाकरे बंधूंच्या संयुक्त सभांना सुरुवात होणार असून मुंबई मिळवण्यासाठी दोन्ही भावांनी कंबर कसली आहे.

उद्धव-राज यांच्या संयुक्त सभांचा धडाका



५ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या या मोहिमेत मुंबईतील तीन महत्त्वाच्या ठिकाणी ठाकरे बंधुंच्या संयुक्त सभांचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई पश्चिम उपनगर, पूर्व उपनगर आणि ऐतिहासिक शिवाजी पार्क मैदानावर ठाकरे बंधू एकाच व्यासपीठावर पाहायला मिळणार आहे. यासोबतच ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि मीरा-भाईंदरमध्ये प्रत्येकी दोन्ही बंधुंची एक संयुक्त सभा होणार आहे. तर मुंबईच्या बाहेर नाशिक महापालिकेसाठीही उद्धव आणि राज ठाकरे यांची एक मोठी संयुक्त सभा होणार आहे.

केवळ संयुक्त सभाच नाही, तर दोन्ही नेत्यांच्या स्वतंत्र सभांचाही धडाका उडणार असून अवघ्या १४ दिवसांत संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढण्याचे नियोजन करण्यात आले आहे. आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्याही संयुक्त सभा होणार आहेत.

# गुन्हेगारांना उमेदवारी दिलेली नाही : दादांनी फोडले खरातांवर खापर

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १ :** 'राष्ट्रवादी काँग्रेसने कोणत्याही गुन्हेगारांना उमेदवारी दिलेली नाही. आमची सचिन खरात यांच्यासोबत युती राहिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या जागावर उमेदवार देण्याचा त्यांना अधिकार आहे,' असे म्हणत अजित पवारांनी या प्रकरणाचे खापर खरातांवर फोडत वादातून पळ काढण्याचा आज प्रयत्न केला.

पुण्यातील कुख्यात गुंडांच्या टोळीतील तीन सदस्यांनी महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे एबी फॉर्म भरून उमेदवारी दाखल केला. कुख्यात गुंड गजा मारणेची पत्नी जयश्री मारणेने पुणे महापालिका निवडणुकीतून अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या एबी फॉर्मवर उमेदवारी दाखल केलीय. तर दुसरा गुंड बंडू आंदेकर याच्या घरातून लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकरन यांनी कोल्हापूर जेलमधून परवानगी घेत पुण्यात येत राष्ट्रवादी काँग्रेसच्या एबी फॉर्मवर उमेदवारी अर्ज दाखल केला. गुंड गजा मारणे आणि बंडू आंदेकर या दोघांच्या टोळ्यांचे कारनामे राज्यभर प्रसिद्ध आहेत. तरीही त्यांच्या कुटुंबातील सदस्य महापालिका निवडणूक अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधून लढवत आहेत. त्यावरून विरोधकांनी प्रचंड आरोप सुरू केलेत.



अजित पवार म्हणाले की, 'राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतर प्रभागनिहाय जागावाटपाचा प्रश्न सुटेल. ज्या ठिकाणी बी-फॉर्म चुकीच्या पद्धतीने गेले आहेत, त्या जागांवरील उमेदवारी मागे घेण्यात येईल. आतापर्यंत झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये आमची सचिन खरात यांच्यासोबत युती राहिलेली आहे आणि त्यांना काही जागा देण्यात आल्या आहेत. ज्या पक्षाशी युती केली जाते, त्या पक्षाला आपल्या वाट्याच्या जागांवर उमेदवार ठरवण्याचा पूर्ण अधिकार असतो. राष्ट्रवादी काँग्रेसने कोणत्याही गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला उमेदवारी दिलेली नाही. युती आणि जागावाटपाबाबत सर्व निर्णय नियोजनबद्ध पद्धतीने घेतले जात आहेत.'

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात मोठा गोंधळ आणि संभ्रम निर्माण झाला आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस झाल्यानंतरही भाजप आणि शिवसेना यांच्यातील युतीबाबत ठोस निर्णय झालेला दिसला नाही. त्यामुळे महायुतीतील घटक पक्षांमध्ये अस्वस्थता वाढली असून, पुणे पालिकेसाठी वेगळे राजकीय पर्याय तपासले जात असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

# शेकोटी करून उभ्या असलेल्या तिघांवर काळाची झडप

## नववर्षाची पहाट काळरात्र ठरली

■ **वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. १ :** नववर्षाची सुरुवात राज्यात भीषण अपघातांच्या बातम्यांनी हादरवणारी ठरली आहे. पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर कोल्हापुरातील तावडे हॉटेल परिसरात आज १ जानेवारी रोजी पहाटेच्या सुमारास घडलेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला.

ही घटना पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास तावडे हॉटेल चौकात घडली. रस्त्याच्या कडेला शेकोटी करून उभ्या असलेल्या तिघांवर अचानक काळाने झडप घातली. भरधाव वेगात येणाऱ्या इनोव्हा कारचे चालकावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट त्या तिघांच्या अंगावर आदळली. धडक इतकी भीषण होती की तिघांचाही जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच शाहूपुरी पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसर सुरक्षित करून पंचनामा केला. मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी कोल्हापूरच्या सीपीआर रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. अपघातात ठार झालेल्या तिघांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून, त्यांच्या नातेवाइकांचा शोध घेण्यात येत आहे. अपघात नेमका कसा झाला, चालकाचा वेग किती होता आणि वाहनावर नियंत्रण का सुटले, याचा तपास शाहूपुरी पोलिस करत आहेत.

या भीषण घटनेमुळे नववर्षाच्या आनंदावर पाणी फेरले गेले आहे. महामार्गावर पहाटेच्या वेळी वाहनांचा वेग अधिक असतो, त्यातच थंडीपासून बचावासाठी रस्त्याकडेला शेकोटी करून उभे राहणे जीवघेणे ठरत असल्याचे या अपघातातून पुन्हा स्पष्ट झाले आहे.

# एबी फॉर्मची कलर झेरॉक्स जोडलेला अर्ज ठरला वैध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अंतर्गत विसंवाद आणि उमेदवारीवरून निर्माण झालेला रणकंदन अवघ्या महाराष्ट्राने अनुभवला. या सगळ्या गोंधळात आता मुंबईत घडलेला एक प्रकार मात्र सर्वांनाच हादरवणारा ठरला आहे.



मुंबई महापालिकेतील प्रभाग क्रमांक १७३ मध्ये भाजपच्या एका इच्छुक उमेदवाराने उमेदवारी मिळवण्यासाठी अक्षरशः टोक गाठल्याचे उघड झाले आहे. शिल्पा केळुसकर या उमेदवाराला अधिकृत उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी थेट बनावट एबी फॉर्मचा आधार घेत निवडणूक आयोगाकडे उमेदवारी अर्ज सादर केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

विशेष म्हणजे हा एबी फॉर्म मूळ नसून त्याची कलर झेरॉक्स प्रत असल्याचे उघड झाले आहे. तरीही हा अर्ज छाननीदरम्यान वैध ठरवण्यात आल्याने निवडणूक व्यवस्थेवरच गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

या प्रकरणामुळे भाजपमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. कारण प्रभाग क्रमांक १७३ ची जागा युतीतील वाटपानुसार शिवसेना शिंदे गटाला मिळाली आहे. त्यामुळे या प्रभागातून शिंदे गटाकडून माजी नगरसेवक रामदास कांबळे यांच्या पत्नी पूजा कांबळे या अधिकृत उमेदवार म्हणून निवडणुकीच्या मैदानात आहेत. अशा परिस्थितीत भाजपच्या शिल्पा केळुसकर यांनी सादर केलेला बनावट एबी फॉर्म आणि त्यावर वैध ठरलेला अर्ज, यामुळे युतीतील समन्वयावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, हा प्रकार लक्षात येताच मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली.

# राजकारणात घराणेशाही!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मीरा-भाईंदर महापालिका निवडणुकीत एकाच घरातून एकापेक्षा जास्त उमेदवारी देण्याची परंपरा कायम आहे. यंदा चार पती-पत्नी जोडप्या रिंगणात उतरल्या आहेत, त्यात विशेष म्हणजे आस्तिक म्हात्रे यांना शिवसेना ठाकरे गटाने तर त्यांच्या पत्नी ममता म्हात्रे यांना शिवसेना शिंदे गटाने तिकिट दिलं आहे.

शिवसेनेकडून वंदना पाटील आणि विकास पाटील, राजू भोईर दाम्पत्य, तारा घरत आणि मुलगा पवन घरत, तसंच ठाकरे गटाकडून सोमनाथ पवार आणि पूजा पवार जोडपं निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत.

आस्तिक म्हात्रे यांना शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. आस्तिक यांच्या पत्नी ममता म्हात्रे यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. वंदना विकास पाटील यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. वंदना यांचे पती विकास पाटील यांनाही शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.

राजू भोईर यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. तारा घरत यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. तारा यांचा मुलगा पवन घरत यांना शिवसेना शिंदे गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे सोमनाथ पवार यांना उबाठा गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे. सोमनाथ यांच्या पत्नी पूजा पवार यांनाही उबाठा गटाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.उल्हासनगर महापालिका निवडणुकीतही सगेसोयरे मैदानात उतरले आहेत.

# लाडकी बहीण योजनेत भ्रष्टाचार, १३ हजार कर्मचाऱ्यांनी घेतला लाभ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली. महायुतीला जास्त फायदा झाला. लाडक्या बहिणींनी भरभरून मतदान केले. लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून दरमहिन्यांला राज्यातील महिलांच्या खात्यावर प्रत्येकी दीड हजार रुपये दिले जातात.

मात्र, यादरम्यानच्या काळात नियमात बसत नसतानाही अनेकांनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केले आणि योजनेचा लाभ उचलला. आता सरकारकडून अर्जांची छाननी केली जात आहे. योजनेच्या निकषात बसत नसलेल्या लाडक्या बहिणींचे अर्ज सरकारकडून बाद केली जात आहेत. त्यामध्येच आता लाडकी बहीण योजनेत मोठा गैरप्रकार उघड झाला आहे.




१२९०० हून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची धक्कादायक माहिती आरटीआयमधून उघड झाली. या योजनेतून वगळण्यात आलेले असतानाही १२९१५ सरकारी कर्मचारी दरमहा १५०० रुपयांचा लाभ घेत असल्याचे उघड झाले आहे. या नव्या आकडेवारीनंतर योजनेतील अपात्र लाभार्थ्यांची संख्या एक लाखांहून अधिक झाली आहे.

महिला व बालविकास विभागाने या प्रकरणाची कबुली देत संबंधित विभागांना अशा कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यापूर्वी मंत्री अदिती तटकरे यांनी केवळ २३०० सरकारी कर्मचारी लाभ घेत असल्याचे सांगितले होते, मात्र नव्या आयटीआरमुळे ही संख्या तीनपटीने वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

ऑक्टोबरमधील अहवालात १२४३१ पुरुष आणि ७७९८० अपात्र महिलांना लाभ मिळाल्याचे समोर आले होते. त्यामुळे किमान १६४.५२ कोटी रुपयांचा गैरवापर झाल्याचे निष्पन्न झाले होते. सध्या सुमारे २.४ कोटी महिला या योजनेचा लाभ घेत असून राज्य सरकारवर दरमहा सुमारे ३७०० कोटी रुपयांचा खर्च येत आहे.

### तीन महिन्यांची प्रतीक्षा....हाती पडला एकच हफ्ता

पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यांमध्ये नोव्हेंबर महिन्याचा हफ्ता जमा करण्यात आला असून, बुधवारी सायंकाळी अनेक महिलांच्या खात्यांत १५०० रुपयांची रक्कम जमा झाली. या योजनेअंतर्गत नोव्हेंबर आणि डिसेंबर या दोन्ही महिन्यांचे हफ्ते प्रलंबित होते. त्यामुळे वर्षअखेर एकत्रित रक्कम मिळेल, अशी आशा लाभार्थ्यांमध्ये होती. मात्र प्रत्यक्षात नोव्हेंबर महिन्याचाच एक हफ्ता जमा झाल्याने अनेक महिलांचा अपेक्षाभंग झाला आहे. जानेवारी महिन्याचाही हफ्ता एकत्र करून ४५०० रुपये खात्यात जमा होतील, असा अंदाज बांधला जात होता. मात्र प्रत्यक्षात केवळ १५०० रुपये जमा झाल्याने महिलांमध्ये संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

## कोरेगाव भीमा शौर्य दिन

# २०९ वा भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्य दिन अभिवादन सोहळा मोठ्या उत्साहात अकोल्यात साजरा

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

लॉर्ड बुद्धा फौडेशन वंदना संघ यांच्या वतीने गेल्या सन २००८ पासुन अकोल्यात स्थानिक अशोक वाटीका परिसरात ४५ फूट उंचीचा विजयस्तंभ निर्माण करून दरवर्षी १जानेवारीला सकाळी मानवंदना दिली जाते.तसेच समाज प्रबोधन चे कार्यक्रम केले जातात.यावर्षीही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

१ जानेवारी च्या सकाळी लॉर्ड बुद्धा फौडेशन वंदना संघ यांच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी,महार रेजिमेंटच्या सेवानिवृत्त सैनिकांकडून लष्करी शिस्तीतआणि एन सी सी च्या विद्यार्थ्यांनी आणि भीमसैनिकांनी राष्ट्रगीतासह मानवंदना दिली. त्यानंतर समाज प्रबोधन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष इरभान तायडे हे होते. स्वागताध्यक्ष दिवाकर गवई आणि कार्यक्रमाच्या उदघाटक म्हणून किरण चक्रनारायण होत्या.तर प्रमुख वक्ते म्हणून सुमन ताई तिरपूदे, अविका जामनिक,होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. सीमाताई तायडे,तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड दं दी यांनी केले व सूत्र संचालन महादेव तायडे यांनी तर आभार प्रदर्शन मंदाताई तेलगोटे यांनी केले.लॉर्ड बुध्दा वंदना संघाच्या वनमाला अहिर, मंदाताई तेलगोटे, गंगाताई गवई, शोभा पानतावणे, मीनाक्षी तायडे, रुख्मिणी इंगोले, सुलोचना सिरसाट, चंदाताई जवंजाळ, चंद्रकला तायडे, सविता तायडे, विद्याताई अंभोरे, मीनाक्षी सदांशिव, रमेश जवंजाळ, सुनिल तायडे, महादेव तायडे,देवीलाल तायडे, उत्तम सदांशिव, बाळू अंभोरे, दयाराम तायडे, यशवंत इंगोले,जितेंद्र अहिर, डॉ. अरुण चक्रनारायण, हिम्मतरावं सदांशिव, मधुकर शिरसाट, सूर्यकांत शिरसाट, संजय डोंगरे, नाजूकरावं तायडे, नितीन डोंगरे, प्रमोद तेलगोटे, रेवत खाडे,



बलदेव इंगळे, संजय मेश्राम, गणेश मेश्राम, खांडेकर, गुलाबराव कंकाळ, संदीप खोब्रागडे, अनिता खोब्रागडे, कैलास गवई आदिसह इतरांची उपस्थिती होती.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १ जानेवारी १९२७ रोजी विजयस्तंभाला भेट दिली होती. या भेटीला १०० वर्षे पूर्ण होत असल्यामुळे यंदाचे वर्ष 'मानवंदना शताब्दी वर्ष' म्हणून साजरे केले आहे. महार रेजिमेंटच्या निवृत्त सैनिकांकडून लष्करी शिस्तीत एन सी सी च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीतासह मानवंदना दिली .१ जानेवारी १८१८ रोजी भीमा नदीच्या काठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि पेशवा (मराठा महासंघ) यांच्या सैन्यामध्ये ही ऐतिहासिक लढाई झाली होती.

## गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा दौरा

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪



गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर हे शुक्रवारी (२ जानेवारी) अकोला येथे येत आहेत.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : वर्धा येथून वाहनाने सकाळी १०.३० वा. अकोला येथे आगमन व गोरक्षण मैदान येथे विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीद्वारे आयोजित विटेक्स (विदर्भ उद्योग व व्यापार प्रदर्शन २०२६) या कार्यक्रमाला उपस्थिती, दु. १२ ते २ वा. राखीव, सोयीनुसार अंजनगाव सुर्जीकडे प्रयाण.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची ४ जानेवारी रोजी जाहीर सभा

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

राज्याचे मुख्यमंत्री लाडक्या बहिणीचे भाऊ देवाभाऊ, देवेंद्र फडणवीस राजेश्वर नगरीमध्ये महानगरपालिकेतील भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ दिनांक ४ जानेवारी रविवार रोजी सकाळी दहा वाजता स्थानिक क्रिकेट क्लब मैदानावर जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी येणार आहेत.यासाठी पक्षाच्यावतीने ३५ वेगवेगळ्या समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा अकोला नगरीमध्ये भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ७६ उमेदवारांच्या प्रचारार्थ आगमन होत असून या निमित्ताने मोठी सभा होणार असून या सभेला इतिहासिक सभेला यशस्वी करण्यासाठी भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे पालकमंत्री ॲडव्होकेट आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल आमदार हरीश



पिंपळे आमदार प्रकाश भारसाकले, आमदार अमोल मिटकरी, जिल्हाध्यक्ष जयंत मसने जिल्हाध्यक्ष विजय देशमुख, बद्रू जमा,ग्रामीण अध्यक्ष संतोष शिवरकर किशोर पाटील कृष्णा शर्मा मदन भरगड आदींच्या नेतृत्वात विविध जबाबदारी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना देण्यात आली असून या सभेमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी केली आहे शहरातील प्रत्येक मतदारांनी आशीर्वाद देण्यासाठी भाजपा उमेदवारांना व महायुतीचे तिबल इंजिन सरकार आणण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी होतील असाही विश्वास अग्रवाल यांनी व्यक्त केला

# लग्नाला कुटुंबीयांचा विरोध ठरला जीवघेणा!

## कसुरा गावाजवळ प्रेमी युगुलाची आत्महत्या

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात असलेल्या शेळद गावात एक अतिशय धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. एकमेकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या एका प्रेमीयुगुलाने कुटुंबाच्या टोकाच्या विरोधामुळे मृत्यूला आलिंगन दिले आहे. बुधवारी ३१ डिसेंबर रोजी कसुरा गावाजवळील रेल्वेमार्गावर या दोघांचे मृतदेह आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.अक्षय सुरेश थारकर (वय ३२) आणि अक्षदा मोहन शेजोळे (वय २४) अशी मृतकांची नावे असून दोघेही शेळद परिसरातील रहिवासी होते. अक्षय हा वाहन चालक म्हणून काम करत होता, तर अक्षदा अंत्री येथील एका कॉन्व्हेंट शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होती. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचे प्रेमसंबंध होते आणि त्यांना विवाह करून संसार थाटायचा होता. मात्र, त्यांच्या या नात्याला दोन्ही कुटुंबांकडून प्रचंड विरोध होता.

घरच्यांच्या या विरोधामुळे दोघेही मानसिक तणावाखाली होते. शेवटी या विरोधाला कंटाळून त्यांनी रेल्वेखाली धाव घेत आपले जीवन संपवल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांना रेल्वेमार्गालगत मृतदेह दिसल्यानंतर त्यांनी तातडीने उरळ पोलिसांना याची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून उरळ पोलीस ठाण्याचे ठाणेदार पंकज कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश कायंदे आणि त्यांचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून दोन्ही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले. या दोन्ही मृतदेहांचे शवविच्छेदन करण्यात आले आहे.या घटनेमुळे शेळद गावावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## थोडक्यात

### आचारसंहितेमुळे लोकशाहीदिन नाही

**अकोला :** महापालिका क्षेत्रात निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्याने जिल्हास्तरीय लोकशाहीदिन होणार नाही. आचारसंहिता संपेपर्यंत लोकशाहीदिन आयोजित करता येणार नाही, याची नोंद संबंधितांनी घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी केले आहे.

### सैनिक कल्याण विभागात पदभरतीला मुदतवाढ

**अकोला :** सैनिक कल्याण विभागाच्या लिपीक टंकलेखक पदांच्या भरतीसाठी ९ जानेवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येईल. यापूर्वी ऑनलाईन अर्जासाठीच्या वेबलिंकबाबत तांत्रिक त्रुटी आल्याने मुदतवाढ देण्यात आली आहे .https://cdn3.digialm.com/EForms या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.

### अंतिम पैसेवारी जाहीर

**अकोला ;** जिल्ह्यात एकूण १ हजार १२ गावांपैकी ९९० गावांची पैसेवारी काढण्यात आली आहे. या गावांची पैसेवारी ५० पेक्षा कमी (४८ पैसे) अशी जाहीर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबत पत्र जारी केले. सर्व ग्रामपंचायत कार्यालय स्तरावर, चावडीवर, तसेच दवंडीद्वारे प्रसिद्धी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### जिल्ह्यात रात्री थंडीचा कडाका

**अकोला :** अकोला जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून रात्रीच्या वेळी थंडीचा जोर लक्षणीयरीत्या वाढलेला दिसून येत आहे. दिवस आणि रात्रीच्या तापमानातील वाढता फरक नागरिकांच्या आरोग्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहे. मंगळवारी जिल्ह्यात किमान तापमान ११.५ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान ३०.५ अंश सेल्सिअस नोंदविण्यात आले. दिवसा थंड हवा जाणवत असून, सूर्यास्तानंतर थंडी अधिक तीव्र होत आहे. पहाटेच्या वेळी गारठा वाढत असल्याने नागरिकांना अधिक काळजी घ्यावी लागत आहे. या बदलत्या हवामानाचा परिणाम विशेषतः वृद्ध नागरिक, लहान मुले तसेच सर्दी कफ, दमा व श्वसनविकार असलेल्या रुग्णांवर अधिक प्रमाणात होतअसल्याचे वैद्यकीय तज्ज्ञांनीसांगितले आहे. मागील काही दिवसांत सर्दी, खोकला, घसा दुखणे व तापाच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, आरोग्य विभागाकडून नागरिकांना थंडीपासून संरक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रात्री व पहाटेच्या वेळी उबदार कपडे परिधान करणे, थंड वाऱ्यापासून बचाव करणे, गरज नसल्यास उशिरा बाहेर पडणे टाळण.

## नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा पदग्रहण सोहळा थाटात साजरा

# केंद्र– राज्याच्या योजनांनी शहराच्या प्रगतीला नवी गती देणार : खा. अनुप धोत्रे

▪मुर्तिजापुर,दि १ (प्रतिनिधी)▪

शहराच्या राजकारणात आणि विकासाच्या प्रवासात आज ऐतिहासिक क्षण साजरा झाला. नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल रेखा रामेश्वर साबळे यांचा पदग्रहण सोहळा मुर्तिजापूर नगरपरिषद कार्यालय परिसरात अतिउत्साह, आनंदोत्सव आणि जल्लोषाच्या वातावरणात पार पडला.

संपूर्ण परिसर फुलांनी सजला असून, घोषणांचा गजर आणि नागरिकांची मोठी उपस्थिती यामुळे शहरात नव्या विकास पर्वाची जोरदार सुरुवात झाल्याचे चित्र दिसून आले.या सोहळ्यास खासदार संजय (अनुप) भाऊ धोत्रे, आमदार हरिष मारोतीआप्पा पिंपळे, आमदार रणधीरभाऊ सावरकर, आमदार वसंतभाऊ खंडेलवाल, आमदार प्रकाशभाऊ भारसाकळे तसेच



जिल्हाध्यक्ष संतोषदादा शिवरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.'केंद्रातून विकासासाठी अखंड पाठपुरावा' – खासदार संजय धोत्रेमंचावर बोलताना खासदार संजय भाऊ धोत्रे यांनी मुर्तिजापूरच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून आवश्यक असलेली सर्व कामे मंजूर करून घेण्यासाठी नियमित व प्रभावी पाठपुरावा केला जाईल.

असा ठाम शब्द दिला. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुर्तिजापूरच्या पुढील विकासाकडे विशेष कृपादृष्टी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.'निधी कमी पडू देणार नाही' – आमदार हरिष पिंपळे यावेळी आमदार हरिष भाऊ पिंपळे यांनी नगरपरिषद हद्दीतील विकासकामांसाठी निधीची कोणतीही अडचण येऊ दिली जाणार नाही, असे जाहीर करत शहराच्या पायाभूत सुविधा, नागरी सोयी-सुविधा आणि सर्वांगीण प्रगतीसाठी राज्यस्तरावर भक्कम पाठबळ देण्याची ग्वाही दिली.

प्रशासन, पोलीस व सर्वपक्षीय नगरसेवकांचे स्वागत नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी निलेश जाधव, तहसीलदार शिल्पा बोबळे, शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव व ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्रीधर गुठ्ठे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष हर्षल साबळे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## नववर्षाच्या पुर्व संध्येला अकोला पोलीसांनी नाकाबंदी



▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

नववर्षाच्या पुर्व संध्येला अकोला जिल्ह्यात मा. पोलीस अधीक्षक, श्री. अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच नविन वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी नागरिकांना सुरक्षित आणी शांततामय वातावरण मिळावे याकरीता नाकाबंदी / कोम्बींग ऑपरेशन मध्ये जिल्हयातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी व दुय्यम अधिकारी असे एकुण ७० अधिकारी व ३६१ अंमलदार यांनी सहभाग घेवुन खालील प्रमाणे प्रभावी कारवाई करण्यात आली.

# १६ उमेदवारांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

आज दि. १ जानेवारी २०२६ रोजी उमेदवारी मागे घेणा-यांची नांवे झोन क्रं. १ मधून – निरंक झोन क्रं. २ मधून – १) उमेश हिरालाल श्रीवास्तव, प्रभाग क्रं. ३ क, २) चोपडे मंगला प्रवीण, प्रभाग क्रं. ४ अ, ३) जया नरेंद्र दिंडोकार प्रभाग क्रं. ४ ब, ४) चेतन आत्माराम जळमकार, प्रभाग क्रं. ५ ड ५) राजेंद्र आनंद गिरी, प्रभाग क्रं. ६ ब झोन क्रं. ३ मधून – १) सौ.सरिता संतोष सोळंके, प्रभाग क्रं. १७ अ, २) राहूल गणेराव वानखडे, प्रभाग क्रं. ४ अ, ३) निलेश दामोधरराव वानखडे, प्रभाग क्रं. १० ड, ४) शरजील अनस अहमद हसन, प्रभाग क्रं. ९ ड ५) शाहिस्ता परवीन जावेदुर रहमान खान, प्रभाग क्रं. ८ क झोन क्रं. ४ मधून – १) शेख ईब्राहिम शेख कासम, प्रभाग क्रं. ११ अ झोन क्रं.५ मधून – १) मुरूमकार वैभव जगदीश, प्रभाग क्रं. १४ क, २) अंजली पंकजराव देशमुख, प्रभाग क्रं. १३ क, ३) मुरमकार पुजा कपिल, प्रभाग क्रं. १३ ब, झोन क्रं. ६ मधून – १) पळसपगार पंकज, प्रभाग क्रं. १९ अ, २) पवार दिनेश प्रल्हाद, प्रभाग क्रं. १९ ब, असे एकुण ६ झोन अंतर्गत एकुण १६ उमेदवारांनी, उमेदवारी अर्ज मागे घेतला.

# दिव्यांग रोजगारासाठी खंडेलवाल भवनात प्रदर्शनीचे आयोजन

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

स्थानिक दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला व खंडेलवाल महिला मंडळ अकोलाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ व ४ जानेवारी २०२६ रोजी संक्रांति विशेष प्रदर्शनाचे आयोजन खंडेलवाल भवन, आळशी प्लॉट अकोला येथे करण्यात आले आहे . सदर प्रदर्शनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेल्या विविध शोभिवंत वस्तू व पूजा साहित्याचा भव्य स्टॉल उपलब्ध असणार आहे . सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत उपलब्ध असलेल्या या प्रदर्शनाला भेट देऊन दिव्यांग बांधवांना त्यांच्या पायावर उभे राहण्यासाठी सहकार्य करावे असे आव्हान आयोजन समितीच्या आरती खंडेलवाल यांनी केले आहे. ३ जानेवारी रोजी उद्घाटन व विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन असून, ४ जानेवारी रोजी दिव्यांग बांधवांचे प्रेरणास्थान ब्रेल लिपीचे जनक लुईस ब्रेल यांची जयंती मोठ्या जल्लोषात साजरी होणार




आहे. दिव्यांग सोशल फाउंडेशन अकोला तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांना पांढरी काठी, ब्रेल बुक्स व शिष्यवृत्तीचे वाटप यावेळी करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ.विशाल कोरडे यांनी दिली. महिला व दिव्यांग बांधवांना रोजगार देण्यासाठी खंडेलवाल महिला मंडळातर्फे हे विशेष आयोजन करण्यात येत असून नागरिकांनी या प्रदर्शनीला भेट देऊन प्रोत्साहन द्यावे अशी माहिती सीमा खंडेलवाल, रश्मी खंडेलवाल, दर्शना खंडेलवाल, प्रिया खंडेलवाल, मंजू खंडेलवाल व पायल खंडेलवाल यांनी दिली

## गट ब संयुक्त सेवा पूर्वपरीक्षा २१ केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त सेवा पूर्व परीक्षा-२०२५ जिल्ह्यात २१ उपकेंद्रावर दि. ४ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दु. १२ या वेळेत होणार आहे. त्यानुसार या केंद्रांवर दि. ४ जानेवारीस सकाळी ६ ते सायं. ८ दरम्यान १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी याबाबत आदेश जारी केला.केंद्रावर पाचहून अधिक व्यक्तींनी एकत्रित प्रवेश करू नये, झेरॉक्स सेंटर, पानपट्टी आदी बंद ठेवावे. मोबाईल, लॅपटॉप, इंटरनेट साधने वापरास मनाई आहे. अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाही.

# भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सदस्यांचा पदग्रहण सोहळा संपन्न

▪तेल्हारा,दि १ (प्रतिनिधी)▪

दि.१/१/२०२६ रोजी तेल्हारा नगर परिषद निवडणुकीत नवनिर्वाचित नगराध्यक्षा तथा नगरसेवक/नगरसेवीका यांचे आभार पदग्रहण सोहळ्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार प्रकाश भाऊ भारसाकळे, तथा प्रमुख मार्गदर्शक युवा खासदार अनुप भाऊ धोत्रे जिल्हा अध्यक्ष संतोषजी शिवरकर, महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष,सौ. जयश्रीताई पुंडकर,गजानन भाऊ उंबरकार जिल्हा उपाध्यक्ष ,डॉ.संजयजी शर्मा जिल्हा सचिव,गणेश भाऊ रोठे मंडळ अध्यक्ष,अकोट मंडळ अध्यक्ष गोपाल भाऊ मोहोड योगेश भाऊ गोतमारे,,नगर सेवा समेतीचे दयाल भाऊ बलोदे, मुलचंदजी राठी,अनिल भाऊ पोहने,रुपेश भाऊ राठी,प्रा.सुधाकरजी येवले, ताराचंदजी पालिवाल,कुलदिप तराळे, तालुका सरचिटणीस रामेश्वरजी हागे, लखन




बगाडे,महिलाआघाडी मंडळ अध्यक्षा मोनिकाताई वाघ,सिध्दार्थजी रुहाटिया उद्योजक, उमेशजी राठी,यांच्या उपस्थितीत नगर परिषद आवारात नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ वैशालीताई पालिवाल हिवरखेड नगर परिषद चे अध्यक्षा सौ. सुलभाताई दुतोंडे तथा नवनिर्वाचित नगर सेवक सतिषजी जयस्वाल,सौ.अरुणाताई ठाकरे नगरसेवा समितीचे विजयसिंहजी बलोदे,गटनेते अतुल भाऊ विखे,साक्षीताई वानखडे (पांडव) अमित भाऊ अग्रवाल,सौ.भक्तीताई छांगाणी, जितेंद्रजी राठी,सौ.गायत्रीताई सोळंके,सौ.संध्याताई गावत्रे,रूपेश भाऊ चव्हाण,नगर सेवा समेतीचे कार्यकर्ते शहरातील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

# सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन सावित्री उत्सव म्हणून साजरा करा : बबनराव कानकिरड

▪अकोला,दि १ (प्रतिनिधी)▪

स्त्री शिक्षणाचा दीप प्रज्वलीत करून समाजात ज्ञानाची पहाट आणणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन ३ जानेवारी हा नविन वर्षातील पहिला उत्सव सर्वत्र 'सावित्री उत्सव ' म्हणून साजरा करण्याचे आवाहन राष्ट्र सेवा दलाचे राज्य कार्यकारिणी सदस्य बबनराव कानकिरड यांनी केले आहे. सावित्रीबाईनी शेण, दगडांचा मारा सहन करत स्त्रियांच्या शिक्षणा साठी खडतर वाट तुडवली. त्यांच्या त्यागातूनच आज महिला शक्तीसाठी शिक्षणाची प्रशस्त वाट निर्माण झाली आहे. या वाटेवरून चालतांना सावित्रीमाईची आठवण ठेवणे ही आजची सामाजिक गरज आहे. त्याची सुरुवात स्वतःपासून, स्वताच्या घरापासून करू या. घरोघरी पणती लावू या, घरासमोर रांगोळी काढून स्त्री शक्ती चा सन्मान करू या .

सावित्री उत्सव म्हणजे केवळ सजावट करायची नाही तर समतेच्या मूल्यांचा स्वीकार आहे. स्त्री –पुरुष समानतेचा संकल्प आहे. महिला




शक्ती चा सन्मान आहे.समतेच्या विचारा ची पेरणी करून समृद्ध भारत घडवू या ! सावित्रीबाई आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य आजही अपूर्ण आहे. अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता आणि स्त्री दमणाचे अंधार अजुनही समाजात दाटलेले आहेत अशावेळी प्रत्येक नागरिकाने अज्ञान, अंधश्रद्धा, विषमतेविरुद्ध जागर करण्यासाठी सावित्री उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्र सेवा देलाचे वतीने बबनराव कानकिरड यांनी केले आहे.

महासागर ●शुक्रवार,दि.२ जानेवारी २०२६

अकोला पान ६

## विवाहिताचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपातून सासरच्यांची निर्दोष मुक्तता

**अकोला** : नवविवाहितेचा छळ करून तिला पैशासाठी तगादा लावून आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपातून पतीसह सासू आणि सासऱ्याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की, कुटासा येतील नागे परिवारात अकोला येथील काळे परिवाराच्या मुलीचा विवाह करण्यात आला होता. त्यानंतर सदर विवाहामध्ये हिरो होंडा मोटरसायकल आणि मोबाईल दिला नाही म्हणून सासरच्या मंडळींनी मृतक आरती हिला सतत पैशासाठी तगादा लावून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केला त्यामुळे तिने खदान पोलीस स्टेशन हद्दीतील तिच्या माहेरी कौलखेड येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यानंतर मुलीचे वडील गणेश काळे यांनी सदर घटनेची फिर्याद पोलिसांना दिली . २१ वर्षीय मृतक नवविवाहिता आरती हिच्या आत्महत्येस जबाबदार म्हणून आणि तिचा छळ केल्याप्रकरणी पती प्रवीण भास्कर नागे, सासरे भास्कर आत्माराम नागे आणि सासू सौ सुनीता भास्कर नागे यांचे सह ननंद सीमा मनोज खराटे यांचेवर दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. विद्यमान तिसरे जिल्हा सत्र न्यायाधीश राहुल शिंदे यांच्या न्यायालयात एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले ज्यामध्ये तपास अधिकाऱ्यांसह सर्वांच्या उलटसाक्षी घेण्यात आल्या. न्यायालयाने आरोपी पक्षाच्या विधीज्ञांचा मुद्देसूद आणि प्रभावी युक्तिवाद लक्षात घेता सर्व आरोपींना निर्दोष मुक्तता दिली . आरोपीच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ मुकुंद जालनेकर आणि विधीज्ञ संजय कमल अशोक देशमुख यांनी काम पाहिले .

## मिशन ९० दिवस'द्वारे शून्य थकबाकी, शून्य अपघात आणि दर्जेदार वीज सेवा–महावितरण अकोला परिमंडळाचा निर्धार :मुख्य अभियंता

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

वीज ग्राहकांची थकबाकी शून्यावर आणणे, अपघातमुक्त परिमंडळ उभारणे, वीज चोरीला आळा घालणे तसेच ग्राहकांना मागेल त्याला तत्काळ व दर्जेदार वीज सेवा देण्यासाठी महावितरण अकोला परिमंडळात 'मिशन ९० दिवस' हा विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मुख्य अभियंता राजेश नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम जानेवारी, फेब्रुवारी व मार्च या तीन महिन्यांत राबविण्यात येणार आहे.

महावितरणच्या या उपक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून ते शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वजण सहभागी असून अकोला, बुलडाणा व वाशिम या तीनही जिल्ह्यांमध्ये ग्राहकाभिमुख सेवा अधिक प्रभावीपणे देण्यावर भर देण्यात आला आहे.शंभर टक्के वीज बिल वसुलीला प्राधान्य परिमंडलातील थकबाकीदार ग्राहकांकडून वीज बिल वसुलीसाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे.



बिल न भरणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा तत्काळ खंडित केला जाणार असून पार्ट पेमेंट स्वीकारले जाणार नाही. वीज बिल वसुली ही महावितरणची जीवनवाहिनी असल्याने, गरज भासल्यास पोलिसांच्या मदतीने ३१ मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण परिमंडळाची थकबाकी शून्यावर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.या उपक्रमांतर्गत शंभर टक्के ग्राहकांना अचूक वीज बिल देण्यावर भर देण्यात आला आहे. वीज सेवा अथवा वीज बिलाशी संबंधित तक्रारी महावितरणच्या ठरावीक कालमर्यादेत निकाली काढल्या जाणार असून, त्याचा सातत्याने पाठपुरावा मंडळ कार्यालयामार्फत केला जाणार आहे. ग्राहकांच्या तक्रारींसाठी तीनही जिल्ह्यांतील कार्यकारी अभियंता (प्रशासन) यांच्याशी थेट संपर्काची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.वाणिज्यिक व वितरण हानी कमी करण्यासाठी वीज चोरीग्रस्त भागात एरियल बंच केबल (AB केबल) टाकणे, वीज चोरीविरोधात सातत्याने मोहिमा राबविणे, ११ केव्ही व ३३ केव्ही वीज वाहिन्यांची दुरुस्ती व सक्षमीकरण, फिडर वेगळे करणे आदी उपाययोजना हाती घेण्यात येणार आहेत. यामुळे ग्राहकांना नियमित व दर्जेदार वीज पुरवठा सुनिश्चित केला जाणार आहे.वीज ही विकासाची जननी असल्याने आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला तातडीने वीज जोडणी देण्यात येणार आहे. पायाभूत सुविधांची आवश्यकता नसलेल्या प्रकरणांत २४ ते ४८ तासांत, तर पायाभूत सुविधा आवश्यक असलेल्या प्रकरणांत महावितरणच्या कृतीमानकांनुसार वीज जोडणी देण्यात येणार आहे.अपघातप्रवण स्थळांची ओळख पटवून तातडीने दुरुस्ती करणे, वीज दुरुस्तीच्या कामादरम्यान सुरक्षा साधनांचा वापर बंधनकारक करणे.

## अत्याचार प्रकरणी पोलीस कोठडी

■अकोला,दि ३१ (प्रतिनिधी)■)

१५ वर्षिय अल्पवयीन मुलीला पळवून नेवून तीच्यावर जबरी अत्याचार करणारा आरोपी योगेश अभिमन्यू वाघमारे (२१) याला प्रभारी जिल्हा व सत्र तसेच विशेष न्यायाधीश पहाडे यांनी १ जानेवारी २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. योगेश वाघमारे रा. हिवरा आश्रम जि. बुलढाणा याने एका अल्पवयीन मुलीस तिच्या पालकांच्या रखवालीतून संभाजीनगर येथे पळवून नेवून जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी योगेश वाघमारे याने मुलीला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करीत त्याच्या विरूध्द दहिहांडा पोलिसात फिर्याद दिली होती. या प्रकरणात आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत आह., गुन्ह्याचा अधिक तपास करणे बाकी आहे,

## आरोपीचे ताब्यातुन एक धारधार लोखंडी स्टीलची तलवार जप्त

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

दिनांक ०१/०१/२०२६ रोजी रेल्वे स्टेशन चौक अकोला येथे नाकाबंदी करीत असतांना पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला येथील पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे व पोस्टेचे डि.बी. पथक यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीचे आधारे आरोपी नामे शब्बीर उर्फ शब्या हुसेन बेनीवाले वय ३२ वर्ष,सैलानी चक्की जवळ, गवळीपुरा अकोला यांचे ताब्यातुन एक लोखंडी (स्टीलची ) ३२.४ ईचाची मोठी धारधार तलवार कि.अ.१२००/ रु चा मुददेमाल जप्त करून आरोपी यांचे विरुध्द पोलीस स्टेशन रामदासपेठ, अकोला येथे अप. न.०१/२६ कलम ४, २५ आर्म अॅक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.सदरची कार्यवाही मा. श्री. अर्चित चांडक सा. पोलीस अधिक्षक अकोला, श्री बी. पी. रेडडी सा, अप्पर पोलीस अधिक्षक सा, श्री. सुदर्शन पाटील सा, उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग अकोला,यांचे मार्गदर्शानाखाली पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे पोलीस स्टेशन रामदासपेठ, व पोस्टाफ दादाराव टापरे, पो.कॉ. श्याम मोहळे, अनिल धनभर, इमाम चौधरी, अभिजीत इगळे, मोहम्मद जाकीर, आशुतोष गवळी, अंकीत कमलाकर, रवी नागे, रमेश गंगलवार सर्व नेमणुक रामदापेठ, अकोला यांनी केली.



## डॉ.आर.आर.कांबे दंत महाविद्यालयाचा बिडीएस प्रथम वर्षाचा ९८% निकाल

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

म्हाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ, नाशिक व्दारे बिडीएस प्रथम वर्षाची वार्षिक परीक्षा घेण्यात आली होती, त्यात डॉ. डॉ.आर.आर. कांबे दंत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. बिडीएस प्रथम वर्षाचा ९८% निकाल लागलेला आहे. त्यामध्ये महाविद्यालयातुन प्रथम कु. प्रांजली दत्तुजी निकुरे, व्दितीय श्रेयस विजय मालवंडे, तेजल राजु पेटकुले आणि तृतीय सानिका वामण पवार अनुक्रमे आलेले आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेउन महाविद्यालयाचे नावाचा ठसा उमटविला आहे.

## तुळसाबाई कावल विद्यालयाच्या सोनिया नागरे मॅडम राज्यस्तरावर

■पातूर,दि १ (प्रतिनिधी)■

तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पातुर येथील सहाय्यक शिक्षिका कुमारी सोनिया नागरे मॅडम यांची निवड राज्यस्तरीय स्पर्धे करिता झालेली आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था (डउएठढ), महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने राज्यातील शिक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी ४३ प्रकारच्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यातील एम एस पावर पॉईट प्रेझेंटेशन या प्रकारात अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा आणि वाशिम यांची विभागीय स्पर्धा गवर्नमेंट गर्ल्स हायस्कूल अमरावती येथे दिनांक १९ नोव्हेंबर रोजी, पार पडली. या स्पर्धेत तुळसाबाई कावल विद्यालय पातूर येथील विज्ञान शिक्षिका कु. सोनिया प्रभाकर नागरे यांनी सुयश प्राप्त केले आहे. धाराशिव येथे होणाया राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्या अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

वभागीय स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करित राज्यस्तरावर निवड झाल्यानिमित्त बेरार एडुकेशन सोसायटीचे व्यवस्थापक श्री. विजयसिंह गहिलोत, सचिव स्नेहप्रभादेवी गहिलोत, प्राचार्य अंशुमानसिंह गहिलोत, उपमुख्याध्यापिका रश्मी वाशिमकर, पर्यवेक्षिका प्रीती कारस्कर, पर्यवेक्षक संजय मुखाडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## प्रा.डॉ. विजय चव्हाण यांना रासेयो पुरस्काराने सन्मानित

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती विभाग अमरावतीच्या वतीने बिहाली, चिखलदरा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे 'विभागीय नेतृत्व गुण विकास शिबिराचे' आयोजन आयोजन करण्यात आले होते. तीन दिवशीय या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकार-याना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये अकोला जिल्ह्यातून महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय गांधीग्रामचे प्रा डॉ विजय चव्हाण यांना जिल्हास्तरीय आदर्श कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्रा चव्हाण यांनी मागील चार वर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गांधीग्राम येथील शालेय परिसरा बरोबरच गोपलखेड,नैराट- वैराट, सांगवी बाजार आणि या वर्षी निंभोरा येथे ग्रामीण विशेष शिबिराचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशासन, संस्कार, शिस्त,श्रमप्रतिष्ठा, सामाजिक व राष्ट्रीय मुल्य रूजविण्याचे, कार्य केले आहे.एवढेच नव्हे तर ग्रामीण विशेष शिबिराच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता, शोष खड्डे, वृक्षारोपण, आरोग्य शिबीर, प्रभातफेरी, जनजागृती रॅली, अंधश्रद्धा निर्मूलन,



**अकोला:** स्वस्त धान्य दुकानांमधून दिले जाणारे निकृष्ट दर्जाचे धान्य बदलून खाण्यायोग्य धान्य देण्यात यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांनीकेली.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My HUSBAND Passport Old Passport No is **(K1749088)**
----OLD NAME---
**QAMRUNNISA**
----NEW NAME----
**QAMRUNNISA MOHAMMED KALEEM MOMIN**
My Residential Address is :- A R Bakery Mohammad Ali Road Near Mominpura masjid Akola Maharashtra 444001.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Old Passport No is (K1749087)
----OLD NAME---
**QAMRUNNISA MOHAMMED KALEEM**
----NEW NAME----
**QAMRUNNISA MOHAMMED KALEEM MOMIN**
My Residential Address is :- A R Bakery Mohammad Ali Road Near Mominpura masjid Akola Maharashtra 444001.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name
----OLD NAME---
**SAHIDA BEGUM AFZAL KHA**
----NEW NAME----
**SAIDA BEGUM USMAN KHAN**
DOB is 16/09/1968
My Residential Address is :- Gudwala plot Near Rais bhai Chakki old city Akola Maharashtra 444001

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My WIFE Passport Old Passport No is **(K1749087)**
----OLD NAME---
**MOHAMMED KALEEM**
----NEW NAME----
**MOHAMMED KALEEM MOMIN ABDUL RAHMAN**
My Residential Address is :- A R Bakery Mohammad Ali Road Near Mominpura masjid Akola Maharashtra 444001.

## जाहिर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं.२३१४/२०२५
चौ.ता.१२/०२/२०२६

प्रोसेस नं.२११९५/२०२५
चौ.ता.३१/१२/२०२५

**अर्जदार** १.वामनराव दादाराव पुंडकर,रा.ग्रामीण बँक जवळ, गुप्ते मार्ग,जठारपेठ,अकोला ता.जि.अकोला.२.राजू दादाराव पुंडकर ३.दुर्गा दादाराव पुंडकर ४.रविंद्र दादाराव पुंडकर **अर्जदार** क्र.२ ते ४ रा.खंडेलवाल धर्मशाळा रेल्वे स्टेशन चौक, रामदासपेठ, अकोला ता.जि.अकोला.....**विरुद्ध**....
**गैरअर्जदार** :-निल **मयताचा पत्ता :- मयत** : १. दादाराव भगवंतराव पुंडकर २.मनोरमा दादाराव पुंडकर **पत्ता** : रा. खंडेलवाल धर्मशाळा,रेल्वे स्टेशन चौक, रामदासपेठ, अकोला ता.जि.अकोला. या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे. की मयत दादाराव भगवंतराव पुंडकर यांचे **दि.३०/०१/२०२५ रोजी** अकोला ता.जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास **दि.१२/०२/२०२६ रोजी** सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालया मध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही.असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज **दिनांक ३१/१२/२०२५ रोजी** माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर),अकोला**

## पातुर येथे साने गुरुजी जयंती व मंडळाचा १५ वा वर्धापन दिना निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

■पातुर,दि १ (प्रतिनिधी)■

पातूर येथील साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहू.मंडळ,व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण, आणि स्वामी विवेकानंद युवती बहु.मंडळ व कान्होबा महिला बचत गट,पातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ ते १० वाजे पर्यंत स्वामी विवेकानंद सभागृह कान्होबा चौक,पातूर येथे साने गुरुजी यांची जयंती व साने गुरुजी मंडळाचा १५ वा वर्धापन दिन आणि राष्ट्रीय ग्राहक दिना निमित्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पातूर येथील सेवानिवृत्त संगीत शिक्षण श्री सुधाकर उगले सर व संगीत पारंगत अमोल उगले आणि नारायण तिडके व मंडळाचे संस्थापक युवाश्री विशाल राखोंडे उपस्थित होते.यावेळी कार्यक्रमाची सुरुवात ही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे व श्याम ची आई या पुस्तिकेचे पूजन व दीप प्रज्वलन करून आणि खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे ही प्रार्थना सामूहिक रित्या गाऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर मंडळाव्दारे उपस्थित मान्यवरांचे स्वागत हे वृक्ष, पुस्तक व कापडी पिशवी देऊन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व साने गुरुजी मंडळाने गेल्या १५ वर्षा मध्ये केलेल्या व करत असलेल्या संपूर्ण कार्याची माहिती देऊन व राष्ट्रीय ग्राहक दिना निमित्य सर्वांनी भारताचे जागृत ग्राहक बनावे असे आव्हान मंडळाचे संस्थापक युवाश्री विशाल राखोंडे यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये सांगितले तसेच उपस्थित मान्यवरांनी साने गुरुजी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.



## मनपाव्दारा झोन निहाय मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण संपन्न

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने आज दि. १ जानेवारी २०२६ रोजी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांचे मतदान यंत्र सिलींग, मतदान यंत्र हाताळणी, मा.राज्य निवडणूक आयोग यांनी विविध ठरवून दिलेले नमुन्यामध्ये माहिती सादर करणे बाबत कार्यशाळा संपन्न झाली आहे. यावेळी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांनी प्रशिक्षण स्थळांना भेटी मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण मधील सहभागी कर्मचा-यांना प्रशिक्षण समजल का, विचारण केली.

तसेच प्रशिक्षण देणा-या अधिकारी यांचे कडून मतदान यंत्र हाताळणी बाबत प्रायोगिक प्रशिक्षण समजून घेतले. तसेच सदर वेळी मध्यान्नामध्ये भोजन करणा-या कर्मचा-यांना भोजन बाबत विचारणा केली. यामध्ये झोन निहाय झोन क्रं. १- अकोला जिल्हा मराठा मंडळ, रामदास पेठ येथे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुनिल चव्हाण, राहूल वानखडे, झोन क्रं. २ - नियोजन भवन, मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी गौरी धायगुडे, तहसीलदार कुणाल झालटे, झोन क्रं.३ - निमवाडी पोलीस वसाहत येथील मल्टीपर्पज हॉल, अकोला येथे तलाठी संदीप पळसपगार, सचिन म्हैसने, झोन क्रं. ४ - राजमाता जिजाऊ अभियंता प्रशिक्षण केंद्र, रेल्वे स्टेशन जवळ, अकोला येथे निवडणूक निर्णय अधिकारी संतोष येवलीकर, ग्राम महसूल अधिकारी प्रशांत बुले, झोन क्रं. ५ - डॉ.के.आर.ठाकरे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्याम धनमणे, मंडळ अधिकारी डी.डी. टाले, निखिल साठे आणि झोन क्रं. ६ - महेश भवन, जुना आर.टी.ओ.रोड, अकोला यांनी सदर प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन केले. यावेळी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी यांच्या व्दारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे आणि शंकांचे निरसरण करण्यात आले.



## किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांनी साकारला इको फ्रेंडली फ्रिज

### जिल्हास्तरावर करणार पातूर तालुक्याचे प्रतिनिधित्व

■पातुर,दि १ (प्रतिनिधी)■

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग व विज्ञान मंडळ यांच्या वतीने दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन नुकतेच पार पडले. यामध्ये पातूरच्या किड्स पॅराडाइज पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी साकारलेली इको फ्रेंडली फ्रिज ची प्रतिकृती तालुक्यातून प्रथम आली आहे. प्रतिकृती सकरणारे शाफे खान शोएब खान आणि ओम जाधव हे विद्यार्थी पातूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.पातूर तालुक्यातील चोंढी येथिल महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय येथे ही विज्ञान प्रदर्शनी पार पडली. या दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक गटातील ३३ तर माध्यमिक गटातील ३० अशा एकूण ६३ प्रतिकृतींनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर आधारित विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स व उपयुक्त संकल्पना प्रभावीपणे सादर केल्या. यामध्ये प्राथमिक गटातून पातूरच्या किड्स पॅराडाइज पब्लिक स्कूल च्या शाफे खान शोएब खान व ओम जाधव या विद्यार्थ्यांनी बाजी मारत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकवला आहे. या विद्यार्थ्यांचा विज्ञान अध्यापक मंडळाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र भास्कर, तालुका अध्यक्ष सुनील वावगे यांनी पारितोषिक देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांचा शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी सत्कार केला.



## आकाश उर्फ करण विनोद थुंकेकर एक वर्षाकरीता स्थानबद्ध

■अकोला,दि १ (प्रतिनिधी)■

शहरातील लेबर कॉलनी, कृषी नगर, अकोला येथे राहणारा कुख्यात गुंड इसम आकाश उर्फ करण विनोद थुंकेकर, वय २४ वर्ष, याचे वर यापुर्वी खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी करणे, इच्छापुर्वक दुखापत पोहचवणे, घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवणे, बेकायदेशीर रित्या शस्त्र बाळगणे, शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, फौजदारीपात्र धाकदपटशा करणे करणे असे बरेच गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचे वर यापुर्वी विवीध कलमान्वये प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली होती, परंतु त्याचे वर त्याचा काहीच परिणाम झालेला नव्हता. तो प्रतिबंधक कार्यवाही करून सुध्दा जुमानत नसल्याने त्याचे विरूध्द गंभीर दखल घेण्यात येवुन कुख्यात गुंड आकाश उर्फ करण विनोद थुंकेकर, याचे गुन्हेगारी वृत्तीस आळा बसावा याकरीता मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी त्यास स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हादंडाधिकारी, अकोला यांना सादर केला होता. मा. जिल्हादंडाधिकारी, श्रीमती. वर्षा मीना यांनी सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून तसेच स्वतःचे स्त्रोताव्दारे माहीती मिळवुन सदर कुख्यात गुंड हा धोकादायक व्यक्ती असल्याची खात्री झाल्याने त्यास एकवर्षा करीता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबध्द ठेवण्याबाबतचा आदेश दि. ३०/१२/२०२५ रोजी पारीत केला. मा. जिल्हादंडाधिकारी, सा. अकोला यांचे आदेशावरून आकाश उर्फ करण विनोद थुंकेकर याचा तात्काळ शोध घेवुन त्यास सदरचा आदेश तामील करून त्यास दिनांक ३०/१२/२०२५ रोजी जिल्हा कारागृहात स्थानबध्द केले.सदरची कार्यवाही पुर्ण करण्याकरीता मा. पोलीस अधीक्षक, श्री.अर्चित चांडक यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक, श्री. बी. चंद्रकांत रेड्डी, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, शक्ती कांबळे, प्रदीप पवार, श्रीकांत अजलसांडे, अक्षय तायडे यांनी परिश्रम घेतले.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak, **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# एका लढवय्या नेतृत्वाची अखेर!



बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया यांच्या निधनामुळे, बांगलादेशने एक उत्तुंग नेतृत्व गमावले आहे. आपल्या चार दशकांच्या राजकीय वाटचालीत खलेदा झिया यांनी अनेक आंदोलनांचे नेतृत्व केले आणि अनेक वेळा तुरुंगवास भोगला. त्यांची बांगलादेश मधील लोकप्रियता इतकी मोठी होती की त्या तीन सार्वत्रिक निवडणुकांत एकाच वेळी पाच मतदार संघांतून निवडून आल्या होत्या आणि त्याही निरनिराळ्या विभागातून.

खलेदा झिया यांचा जन्म १९४५ साली जलपैगुडी ( पश्चिम बंगाल ) येथे झाला.त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण दिनाजपूर ( पश्चिम बंगाल ) येथे झाले.खलेदा यांचे वडील व्यावसायिक होते.पुतूल या टोपणनावाने ओळखल्या जाणाऱ्या खलेदा यांचा आपल्या पाच भावंडांमध्ये दुसरा क्रमांक होता.

१९६० मध्ये त्यांचा झियाऊर रेहमान यांच्याशी विवाह झाला. त्यावेळी झियाऊर रेहमान हे पाकिस्तानी सैन्यात कॅप्टन पदावर होते. झियाऊर रेहमान यांची मे १९८१ मध्ये हत्या झाल्यानंतर, त्यांचा पक्ष, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला मोठाच धक्का बसला. अशा परिस्थितीत, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांनी, खलेदा झिया यांना पक्षाचे नेतृत्व करण्याचा आग्रह केला.

तोपर्यंत राजकारणाचा गंधही नसलेल्या, खलेदा यांनी पक्ष कार्यकर्त्यांच्या विनंतीला मान देऊन, राजकारणात प्रवेश केला. जानेवारी १९८४ मध्ये त्या पक्षाच्या उपाध्यक्ष झाल्या.त्यानंतर थोड्याच अवधीत म्हणजे मे १९८४ मध्ये त्या पक्षाच्या अध्यक्षा झाल्या. पक्षाचे अध्यक्षपद त्यांनी आपले निधन होईपर्यंत, म्हणजेच सुमारे चार दशके सांभाळले.

त्या पक्षाच्या अध्यक्षा झाल्या तेंव्हा बांगलादेशात एच एम इर्शाद यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर होते. इर्शाद यांच्या हुकूमशाही आणि दंडेलशाही कारभारामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आपली लोकप्रियता पुर्णपणे गमावली होती. खलेदा झिया यांनी सात पक्षांची मोट बांधून झिया यांच्या नेतृत्वाखालील सरकार विरोधात मोठे जनआंदोलन उभे केले. अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना वाजेद यांनीही इर्शाद यांच्या विरोधात आंदोलन पुकारले होते. या दोन बेगमांनी पुकारलेले आंदोलन बरेच दिवस सुरु होते. अखेर इर्शाद यांनी त्यापुढे शरणागती पत्करून आपल्या पदाचा राजीनामा दिला.



अभय गोखले

१९९० मध्ये इर्शाद यांच्या नेतृत्वाखालील सरकारची गच्छंती झाल्यानंतर, पुढील वर्षी म्हणजे १९९१ मध्ये बांगलादेशात संसदेच्या निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचा विजय झाला आणि खलेदा झिया या बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.

१९९६ साली झालेल्या संसदीय निवडणुकांत खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी हा पक्ष पुन्हा एकदा विजयी झाला, मात्र त्या निवडणुका गैर मार्गाने जिंकल्याचा आरोप, विरोधी पक्षांनी खलेदा झिया यांच्यावर केला आणि निवडणुका रद्द करून, काळजीवाहू सरकारच्या देखरेखीखाली पुन्हा निवडणूका घ्याव्यात अशी मागणी केली. त्या करता अवामी लीगच्या नेत्या शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षांनी प्रखर आंदोलन सुरू केले. अखेर त्या आंदोलनाची दखल घेऊन,खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घटना दुरुस्ती करून, काळजीवाहू सरकारच्या देखरेखीखाली निवडणुका घेण्याची तरतूद केली.

३० मार्च १९९६ रोजी संसद बरखास्त करण्यात आली आणि खलेदा झिया यांनी आपला कार्यभार काळजीवाहू सरकारकडे सोपविला. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग या पक्षाचा विजय झाला आणि शेख हसीना वाजेद या बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या.

२००१ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला प्रचंड विजय मिळाला आणि खलेदा झिया या तिसऱ्यांदा बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या.

२००६ साली खलेदा झिया यांच्या सरकारची टर्म संपल्यानंतर, सैन्याचा पाठिंबा असलेल्या काळजीवाहू सरकारने सत्ता हातात घेतली. काळजीवाहू सरकारने निरनिराळ्या आरोपांखाली खलेदा झिया आणि शेख हसीना वाजेद या दोन बेगमांना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी केली.

२००८ साली झालेल्या निवडणुकीत अवामी लीगचा विजय झाला आणि शेख हसीना वाजेद या दुसऱ्यांदा बांगलादेशच्या पंतप्रधान बनल्या. निवडणुकांत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे कारण पुढे करून, २०१४ मध्ये झालेल्या संसदीय निवडणुकांवर खलेदा झिया यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीने बहिष्कार घातला.

त्या निवडणुकीत अवामी लीगचा विजय झाला, परंतु विरोधी पक्षांनी बहिष्कार घातल्याने त्या निवडणूका फार्स ठरल्या.

फेब्रुवारी २०१८ मध्ये झिया ऑर्फनेज (अनाथालय) ट्रस्ट मधील भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली खलेदांवर खटला दाखल करण्यात आला. न्यायालयाने खलेदा यांना त्याप्रकरणी दोषी ठरवून, त्यांना पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आणि तुरुंगात रवानगी करण्यात आली.

कोविडच्या काळात मार्च २०२० मध्ये तत्कालीन शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील सरकारने खलेदा झिया यांची काही काळासाठी तुरुंगातून सूटका केली. त्यांनी आपले घर सोडू नये आणि देश सोडू नये या अटीवर त्यांची काही काळासाठी तुरुंगातून सूटका करण्यात आली होती.

खलेदा झिया या गेली काही वर्षे आजारी होत्या. त्या काळात त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर मोहंमद युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने खलेदा झिया यांची तुरुंगातून मुक्तता केली. त्यानंतर त्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होत्या.

खलेदा झिया यांच्या निधनामुळे एका लढवय्या नेतृत्वाची अखेर झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता,पक्षाचे कणखरपणे नेतृत्व करणाऱ्या आणि शेख हसीना वाजेद यांना तोडीसतोड लढत देणाऱ्या खलेदा झिया यांना बांगलादेशची जनता कदापी विसरणार नाही.

# लढत रंगणार!

येत्या 15 जानेवारी रोजी राज्यातील 29 महानगरपालिकांची निवडणूक होऊ घातली आहे. 16 तारखेला निवडणुकीच्या निकाल हाती येईल

नगरपंचायत आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये भाजपा, शिंदे सेनेने, अजित पवारांनी उत्तम कामगिरी केली. राज्यातील जनतेने भरभरून मते दिली. कोणत्याही परिस्थितीत 31 जानेवारी 2026 पर्यंत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या असल्यामुळे निवडणूक आयोग कामाला लागला.

आता महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर ग्रामीण महाराष्ट्राच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या केव्हा होणार आहेत? असा प्रश्न ग्रामीण जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक प्रक्रिया घोषित का केली नाही? असा प्रश्न सातत्याने पुढे येत आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा 50% च्या पुढे ओलांडू नये असा स्पष्ट आदेश 28 नोव्हेंबर 2025 च्या सुनावणी दरम्यान दिला होता. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आरक्षणाची 50% ची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. महाराष्ट्रातील 40 नगरपालिका आणि 17 नगरपंचायत मध्ये आरक्षणाची मर्यादा 50% च्या वर गेलेली आहे. महानगरपालिकेच्या चंद्रपूर व नागपूर या दोन ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ओलाढण्यात आली आहे आरक्षणाची 50% ची मर्यादा ओलांडल्यामुळे जे निवडून आलेले नगरसेवक आहेत त्यांचे सदस्यत्व न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून राहणारा आहे.

येत्या 21 जानेवारी 2026 ला माननीय सुप्रीम कोर्ट या संबंधात सुनावणी करणार आहे. तूर्तास मात्र निवडून आलेल्या उमेदवारावर टांगती तलवार उभी आहे. काही वर्षांपूर्वी नागपूर व इतर पाच जिल्हा परिषदाच्या निवडणुका पार पाडल्या होत्या.

या जिल्हा परिषदेमध्ये आरक्षणाची मर्यादा 50% च्या वर केल्यामुळे सुप्रीम कोटाने पुन्हा फेर निवडणूक घेण्याच्या आदेश दिला होता. या सर्व जागा ओबीसी आरक्षणातून निवडून आल्या होत्या. तशीच परिस्थिती भविष्य काळात निर्माण होईल याची जास्त शक्यता आहे.

महाराष्ट्रात जिल्हा परिषदांचे आरक्षण व पंचायत समित्यांचे आरक्षण ही 50% च्या वर गेलेले आहे. 17 जिल्हा परिषद व ८३ पंचायत समितीचे आरक्षण 50% च्या वर गेलेले आहे. नंदुरबार 100%, चंद्रपूर 63% ,नाशिक 71% ,गडचिरोली 78%,आरक्षण काढलेले आहे. दरम्यानच्या काळात सुप्रीम कोटाने आरक्षणाची मर्यादा वाढविता येणार नाही असे सांगितल्या नंतरही नोव्हेंबर 2025 पासून नवीन आरक्षण काढण्याची कोणतीही कार्यवाही निवडणूक आयोगाने केली नाही.

यादरम्यान नवीन आरक्षण काढून निवडणुका घेता आल्या असत्या मात्र निवडणूक आयोगाने वेळ मारून नेलेला आहे. 31 जानेवारीपर्यंत जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणुका होतात किंवा नाही हा खरा प्रश्न आहे.

सुप्रीम कोर्ट आपला दिलेला आदेश फिरवणार काय असा प्रश्न राजकीय तथा सामाजिक कार्यात काम करणाऱ्या पंडितांना पडलेला आहे. यापूर्वीच्या अनेक प्रकरणांमध्ये सुप्रीम कोर्टाने आपले आदेश फिरविल्याचे दिसून येते. त्यामुळे हा आदेश फिरविल्या जाईल आणि जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका पुढे जातील अशी संभाव्य परिस्थिती आहे.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

सध्या सर्व स्तरात एक अराजकता दिसून येत आहे. नेत्यांच्या मुलांना, कुटुंबीयातील सदस्यांना, नातेवाईकांना, तिकिटे वाटप केल्या जात आहे. आयाराम - गयाराम संस्कृती वाढलेली आहे.कोणता राजकीय नेता केव्हा कोणत्या पक्षात जाईल याच्या नेम निश्चित राहिलेला नाही. काल-परवा मुंबईत उद्धव ठाकरे व राज ठाकरे एकत्र आलेत. मुंबईत आघाडी निर्माण केली म्हणून कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला.

या आनंद उत्सवात सहभागी असलेले नेते त्याच दिवशी भाजपावासी झाले. विश्वास कुणावर ठेवणार. सध्याच्या राजकारणाने नैतिकतेचे मोठे उल्लंघन केले आहे. आजीवन पक्षाचे काम करणाऱ्या खऱ्या कार्यकर्त्यावर अन्याय झाल्याचे दिसून आले. आणि अनेकानचे अश्रू अनावर झाले आपण सतरंज्याच उचलायचे काय असा प्रश्न अनेकांनी निर्माण केला.

पक्षनिष्ठा राहिलेली नाही. पक्षाचे धोरण व तत्व शिल्लक राहिलेली नाहीत. राजकीय पक्षही याला जबाबदार आहेत. वेळेवर आयत्या आलेल्या आयतोबाला तिकीट दिल्या जाते सर्वात महत्त्वाच्या प्रश्न पैसा हा आहे. आत्ताची निवडणूक पैसेवाल्याची झालेली आहे ज्याच्याकडे पैसा आहे तोच निवडणुकीच्या रिंगणात उतरेल अशी आजची परिस्थिती आहे. राजकारणातून पैसा व पैशातून सत्ता हे सूत्र भविष्यकाळात सुरू राहणार आहे. पैशाच्या बडावर निवडून आलेले लोक लोकहिताचे कार्य करतीलच असे नाही ते झालेले खर्च कसे काढता येईल या विचारातूनच कार्य करणार आहेत हे स्पष्ट आहे.

महानगरपालिकाच्या रणसंग्रामात घराणे शाहीने मजल गाठली. या निवडणुकांमध्ये कोण बाजी मारणार हे येणारा काळच ठरवेल मात्र भाजपा, शिंदे शिवसेना, काँग्रेस, अजित पवार, वंचित बहुजन आघाडी, यासारख्या पक्षांनी कुठे युती करून तर कुठे आघाडी करून तर कुठे स्वतंत्र लढण्याच्या निर्णय घेतला आहे.

सत्तेचा तराजू कोण झुकविणार याकडे महाराष्ट्राचे लक्ष असताना बऱ्याच ठिकाणी पंचरंगी निवडणुकीचे चित्र राहणार आहे. आजपर्यंत एकमेकांना पाण्यात पाहणारे नेते एकत्र आल्याचे काही ठिकाणी बघायला मिळाले आहे.

कधी सामान्य लोकांची समस्या विचारात न घेणारे उमेदवार उभे ढाकले आहेत. जनतेने याचा सारासार विचार करून मतदान करायला हवे. उमेदवारांचे रचनात्मक, सामाजिक, विधायक, कार्य याच्या संपूर्ण अभ्यास करून मतदान होणे अपेक्षित आहे. लोकशाही सामान्य नागरिकांच्या मतावर अवलंबून आहे. या मताच्या सुबुद्धीने वापर करून आपले प्रतिनिधी निवडल्या गेले पाहिजे.

सध्याच्या राजकारणाच्या जोर हा जाती व धर्मावर आधारित दिसून येतो. जात आणि धर्म हा बाबी राजकारणातून दूर झाल्या पाहिजेत त्यासाठी जागरूक मतदारांनी जागृत होऊन मतदान प्रक्रियेत भाग घ्यायला हवा. निवडणूक रंगतदार होणार आहे. अत्यंत घाईत घेतल्या जात असलेल्या या निवडणुकांच्या माध्यमातून गेल्या सात वर्षांपासून असलेले प्रशासक राज्य संपून लोकांच्या हाती सत्ता येणार आहे.

या सत्तेचा उपयोग लोक कल्याणासाठी, प्रभागातील समस्यांच्या निपटारा करण्यासाठी, आपले शहर सुंदर करण्यासाठी, होईल अशी अपेक्षा करूया.

# वुई कॅरी ऑन रिपेरिंग टूल्स इन अवर बॉडी

एकीकडे अतिप्रगत विज्ञान अधिकु प्रगत होत असतानाही कॅन्सर, डायबिटीज, ऑटिझम, आर्थराइटिस, सेरेब्रल पाल्सी यांसारखे आजार अजूनही असाध्य आहेत. आणि या आजारांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

आता तुम्हाला या आजारा सोबतच राहायचे आहे आणि मरायचे आहे.. अशी म्हणण्याची वेळ जेव्हा येते तेव्हा मी अत्यंत दुःखी होतो आणि वाटतं की कुठेतरी चुकते आहे यावर काम झाले पाहिजे. असे म्हणणारे स्टेम आरएक्स हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक आणि पुनरुत्पादक शास्त्रातील तज्ञ डॉ. प्रदीप महाजन स्टेम सेल थेरपीकडे वळले आणि आज मूळ पेशी पुनरुत्पादित करून हजारो असाध्य रोगाने ग्रासलेल्या रुग्णांना पूर्णपणे बरे करण्याची किमया घडवून आणत आहेत.

डॉ. प्रदीप महाजन म्हणतात की, मानवाच्या शरीराला नैसर्गिक अशी देण आहे. मानवाच्या शरीरातील पेशीच झालेला आजार बरा करीत असतात. डॉक्टरांचे ब्रीदवाक्य आहे की, वी कॅरी ओन रिपेरिंग टूल्स इन अवर बॉडी. यानुसार एखादी पेशी, एखादी टिशू, एखादी ऑर्गन जर पेशी लेव्हलवर डॅमेज झाला असेल तर ही पेशी मूळतः रिपेअर केली तरच हा रोग मुळापासून बरा होऊ शकतो. फक्त मॉडर्न मेडिसिनचे औषध घेतले तर लक्षणे केवळ कमी होतात पण तो आजार पूर्णपणे बरा होत नाही. पुनरुत्पादन शक्ती वाढविण्यासाठी बोनमॅरो, चरबी, रक्त यामधील पेशींचा वापर केला जातो आणि इंजेक्शन द्वारे इंजेक्ट केल्या जाते.

ते म्हणतात की कॅन्सर सारख्या आजारांमध्ये किमोथेरपी जर मूळ पेशीला संबंधित वापरली किंवा मूळ पेशीपासून तयार होणाऱ्या एक्झोनसोबत वापरली तर केमिकलचा डोज खूप कमी होतो. ही पद्धत फक्त कॅन्सरच्या पेशींना बरं करते व इतर पेशींवर परिणाम होत नाही. आजच्या धावपळीच्या युगात घराघरांमध्ये मधुमेहाचे रुग्ण आहेत. मधुमेह म्हणजे केवळ शरीरात साखरेचे प्रमाण जास्त असणे नाही तर तुमच्या पेशींमध्ये खोलवर होणारे चयापचयामधील बिघाड आहे.

डॉ. महाजन म्हणतात की, स्टेम सेल थेरपी जेव्हा मायटोकॉन्ड्रीयल एक्टिवेशन आणि एक्झोझोम्ससह एकत्रित केली जाते तेव्हा मधुमेह व्यवस्थापनाचे भविष्य बदलते. मधुमेहामध्ये या थेरपीद्वारे खराब झालेले स्वादुपिंड आणि चया पचयाच्या पेशी दुरुस्त केल्या जातात.



इम्यूनोमॉड्युलेशनमध्ये स्टेम सेल्स हे मायटोकॉन्ड्रीया (शरीरातील ऊर्जा पेशी) सोबत एकत्र काम करतात आणि चयापचय संतुलित करण्यास मदत होते. हे संयोजन केवळ मधुमेह नियंत्रित करीत नाही तर शरीराला सामान्य कार्य करण्यास भाग पाडते.

याशिवाय मोडलेले हाड, सांधेदुखी, यासारख्या केसेस मध्ये नॉन सर्जिकल एव्हीएन ट्रीटमेंट द्वारा शस्त्रक्रिया टाळल्या जातात. एनएडी प्लस थेरपी ही बॉडी रीजनरेट करून वृद्धत्व कमी करण्यास मदत होते. तसेच सेरेब्रल पालसी, ऑटिझम, न्यूरो डेव्हलपमेंटल कंडीशन्स, ट्रॉमॅटिक ब्रेन इंजुरीज या असाध्य आजारांना मुळातून बरे केले जाऊ शकते असा डॉ. महाजन दावा करतात.




तुम्ही स्वतःचे दुरुस्ती किट आपल्या आत बाळगता. असे म्हणणारे डॉक्टर प्रदीप महाजन यांनी ३५ वर्षांची प्रदीर्घ वैद्यकीय सेवा आणि संशोधनाच्या सुंदर मिलाफातून स्टेम सेल थेरपी विकसित केली. आणि दहा हजारच्या वर रुग्णांना बरे करीत त्यांच्याकडे विविध ९० देशातून रुग्ण उपचारासाठी येतात. त्यांनी अनेक पुरस्कारासहित २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त केलेला आहे.

त्यांच्या या यशामध्ये त्यांनी सेरेब्रल पालसीचा जगातील ११ महिन्यांचा सर्वात तरुण रुग्ण, भारतातील एम्टी नोज सिंड्रोम चा जगातील पहिला रुग्ण, न्यूरोजेनिक मूत्राशयाचे प्रकरण, इन्फंट ॲम्निओटीक ब्रांड सिंड्रोमची दुर्मिळ केस, भारतातील स्टर्ज वेबर सिंड्रोम चा पहिला रुग्ण यांच्यावरील यशस्वी उपचारांचा समावेश आहे.

त्यांच्या वैद्यकीय व्यवसायिक प्रवासात त्यांनी जोर्टीस हॉस्पिटल आणि सेव्हन हिल्स हॉस्पिटल्स मधील कन्सल्टिंग सर्जन, इंडियाना स्कूल ऑफ मेडिसिन येथे सहाय्यक प्राध्यापक, व्हिएन्ना विद्यापीठ तेर्ना मेडिकल कॉलेज आणि डॉ.आर.एन. कूपर हॉस्पिटलमध्ये अध्यापक म्हणून उत्कृष्ट काम पाहिले आहे.

याशिवाय त्यांच्या शैक्षणिक योगदानात पुनर्जन्मशील औषध संशोधनासाठी इंडियाना आणि ओहायो राज्य विद्यापीठाशी सहकार्य केले आहे. प्रिन्सिपल इन्वेस्टीमेटर म्हणून रीजनरेटिव्ह थेरपी कोर्स पूर्ण केला. पुनर्जन्म औषधाच्या क्षेत्रात २६ संशोधन पत्रे लिहिली. एव्हीन साठी राष्ट्रीय पेटंट तयार केले. तसेच औषधांवरील त्यांच्या अग्रगण्य कायासाठी त्यांना पॅरिस पुरस्कार प्राप्त झालेला आहे.

ते म्हणतात की झपाटून काम करण्याची माज्यातील ऊर्जा याला आईवडिलांचे मिळालेले पाठबळ आणि पिट्सबर्गचे व्हॉइस चान्सलर डॉ. चंदन सेन यांचे भरीव मार्गदर्शन यामुळे मी माझ्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकलो असे ते भाऊक होऊन म्हणतात. स्टेम सेल थेरपी ही अत्याधिक ॲडव्हान्सड प्रणाली असून रुग्णांनी त्याचा पुरेपूर फायदा घ्यावा असे ते आवाहनही माध्यमातून करीत आहे.

---

**डॉ. प्रदीप महाजन संपर्क क्रमांक**
**8898070904**

# राजकीय वास्तव आणि तेली समाज : आत्मपरीक्षणाची वेळ

आज विविध पक्षांनी आपापले उमेदवार जाहीर केले आहेत. उमेदवारांची नावे पाहिल्यावर अनेकांच्या मनात विश्वास बसेल असे बदल दिसत आहेत. हे नवीन नाही.

आजची राजकीय परिस्थिती पाहता हे अपेक्षितच आहे. पण एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते.. जो सामान्य कार्यकर्ता आपला पूर्ण दिवस, वेळ, कुटुंब आणि वैयक्तिक आयुष्य बाजूला ठेवून पक्षासाठी झटतो, बैठका घेतो, कार्यकर्ते जमवतो, पक्षाच्या आदेशानुसार उभा राहतो, त्याच्यावर मोठी जबाबदारी टाकली जाते.

मात्र शेवटी काय होतं? तिकीट वाटपाच्या वेळी त्याची ओळख, त्याची कुटुंबाची पार्श्वभूमी, त्याची क्षमता, त्याचे कर्तृत्व या सगळ्यांकडे दुर्लक्ष करून फक्त काही पदं देऊन मंडल अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे... त्याची समजूत काढली जाते आणि तो पुन्हा निःशब्दपणे कामाला लागतो. ही आजची वस्तुस्थिती आहे.

मग तेली समाजाचं नेमकं काय होतंय? आज आपल्या तेली समाजातील असंख्य बांधव वेगवेगळ्या पक्षांमध्ये जबाबदार पदांवर कार्यरत आहेत. ते प्रामाणिकपणे, निस्वार्थपणे आपला अमूल्य वेळ समाज आणि पक्षासाठी देत आहेत. तरीही प्रश्न राहतोच.. इतक्या मोठ्या संख्येने सक्षम असताना इतके अनुभवी, अभ्यासू, तळागाळात काम करणारे कार्यकर्ते असताना आपली राजकीय कोंडी का होते? याचं उत्तर आपल्यालाच शोधावं लागेल.

**प्रा. स्वप्निल विनोदराव खेडकर**
**संचालक, मराठा तेली समाज विकास मंडळ, अमरावती.**

**एकता आणि एकजुटीचा अभाव हीच खरी अडचण**

आपल्या समाजातील वेगवेगळ्या संघटना, संस्था आणि गट वेगवेगळ्या पक्षांशी जोडले गेले आहेत. प्रत्येक संघटनेत वेगवेगळ्या पक्षांचे पदाधिकारी आहेत. यामुळे आपली ताकद विभागली जाते, आपली एकजूट दिसत नाही, आणि राजकीय पातळीवर आपला आवाज कमजोर पडतो.

आता जागे होण्याची वेळ आली आहे आज कोणत्या पक्षाने कोणत्या समाजबांधवाला तिकीट दिलं, याकडे फक्त प्रेक्षकासारखं पाहून थांबायचं नाही. समाज म्हणून आपली भूमिका स्पष्ट असली पाहिजे. पक्ष कोणताही असो, समाजबांधवाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहिलं पाहिजे.

संघटनात्मक मतभेद बाजूला ठेवून समाजहिताचा निर्णय घ्यायला हवा. वेगवेगळ्या समाजसंघटना, गट, मंडळं.... सर्वांनी एकत्र बसून, चर्चा करून, समाजासाठी एकसंघ भूमिका ठरवण्याची हीच वेळ आहे.

**पुढची दिशा काय?**

समाजातील उमेदवारांची यादी तयार करणे प्रभागनिहाय, पक्षनिहाय माहिती संकलित करणे समाजाची सामूहिक ताकद पक्षांना ठामपणे दाखवणे आणि दीर्घकालीन राजकीय रणनिती आखणे हे सगळं केल्याशिवाय आपली राजकीय ताकद अधोरेखित होणार नाही.

आज गरज आहे ती भावनिक नव्हे, तर विवेकी, एकत्रित आणि दूरदृष्टीने विचार करण्याची. समाज म्हणून आपण एकत्र आलो, तरच आपली खरी ताकद सगळ्यांना दिसेल.

जय संताजी महाराज!

# नववर्षाचे स्वागत - कही खुशी कही गम!

**वाचक लिहितात**

१ जानेवारी हा कॅलेंडर वर्षाचा पहिला दिवस. या दिवशी जन्माला आलेले मूल स्वतःला आयुष्यभर भाग्यवान समजते. पाश्चिमात्य देशांत ९ महिन्याच्या गर्भवती असलेल्या काही स्त्रिया आपले मूल १ जानेवारीला या जगात यावे म्हणून सिझरिंग करून बाळाला जन्म देतात या दिवशी ज्यांचा वाढदिवस असतो ते आपला वाढदिवस अगदी धुमधडाक्यात साजरा करतात. अनेक जण येणाऱ्या वर्षभरात काय ध्येय गाठायचे याची खूणगाठ बांधून १ जानेवारीपासून ध्येयाच्या दिशेने पावले टाकण्यास आरंभ करतात. एकूणच हा दिवस आनंदाचा दिवस मानला जातो. मात्र याच दिवसाच्या पूर्वसंध्येला सरत्या वर्षाला निरोप देण्याच्या आणि येणाऱ्या वर्षाच्या स्वागतासाठी दारू ढोसण्याची आणि पार्ट्या करण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून पडली आहे. भारतात या प्रथेला तर अगदी डोक्यावर बसवले जाते. जल्लोष करण्याच्या नादात अमली पदार्थांचे सेवन केले जाते, छेडछाडीचे प्रकार घडतात, मारामाऱ्या होतात, सूड उगवले जातात, दारूच्या नशेत गाडी चालवल्यामुळे अपघात घडतात, ज्यामध्ये अनेकांना जीवही गमवावा लागतो. एकीकडे या दिवशी जन्माला येण्याचा काही जण आनंद साजरा करत असतात, तर दुसरीकडे ३१ डिसेंबरच्या रात्री मरण पावलेल्यांचे नातेवाईक, मित्र मंडळी आपल्या जवळच्यांच्या जाण्याचा शोक प्रकट करत असतात. माणसाला मृत्यूच्या दारात नेणारे, आयुष्यभराचे व्यसन लावणारे, अनेकांचे संसार उध्वस्त करणारे, भोगवादाला खतपाणी घालणारे हे असले कसले नववर्षाचे स्वागत? अशा प्रकारचे नववर्षाचे स्वागत संस्कृतीप्रिय भारताला न शोभणारे आहे.

■ **जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

# थर्टी फर्स्टच्या पार्टीनंतर हँगओव्हर?



प्रत्येकाने नवीन वषाचं स्वागत मोठ्या उत्साहात आणि आनंदात केलं आहे. अनेकांची तर रात्रभर पार्टी सुरु असेल.. ज्यामुळे अनेकांना अपचन तर झालंच असेल पण ज्यांनी दारू प्यायली आहे. त्यांचं देखील डोकं दुखत असेल तर अनेकांना हँगओव्हर देखील झाला असेल. या समस्येपासून मुक्त होण्यासाठी महागड्या औषधांची आवश्यकता नाही, तर साधे आणि नैसर्गिक उपाय आवश्यक आहेत. घरी मिळणाऱ्या घटकांपासून बनवलेले साधे डिटॉक्स पेये शरीराला रिहायड्रेट करण्यास मदत करू शकतात.

**कोमट लिंबू पाणी** : कोमट लिंबू पाणी डिहायड्रेशन भरून काढतं. ते पोट स्वच्छ करण्यास मदत करतं आणि हँगओव्हरशी संबंधित सूज, जडपणा आणि मळमळ कमी करते. सकाळी हे पाणी प्यायल्यानंतर आराम मिळतो. अर्धा लिंबू एका ग्लास कोमट पाण्यात पिळून घ्या. सकाळी रिकाम्या पोटी हळूहळू प्या जेणेकरून तुमचे शरीर ते योग्यरित्या शोषून घेईल.

**नारळ पाण्यात थोडं मिठ** : जेव्हा शरीर आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स गमावतो तेव्हा हँगओव्हर होतो. नारळ पाणी प्यायल्याने हे इलेक्ट्रोलाइट्स पुनर्संचयित होण्यास मदत होते. एवढंच नाही तर, अशक्तपणा आणि थकवा कमी होतो. एक ग्लास नारळ पाणी घ्या आणि त्यात चिमूटभर खडे मीठ घाला. ते हळूहळू प्या; यामुळे लवकर आराम मिळतो.

**जिरे पाणी** : जिरे पाणी गॅस, आम्लपित्त आणि पोटाच्या समस्यांपासून आराम देतं. हँगओव्हरनंतर पोट शांत करण्यासाठी हा एक सोपा घरगुती उपाय आहे. रात्रभर पाण्यात एक चमचा जिरे भिजत ठेवा. हँगओव्हरनंतर हा एक सोपा घरगुती उपाय आहे.

**अदरक - मधाचं पाणी** : आले पोटातील जळजळ आणि अस्वस्थता कमी करते, तर मध सौम्य ऊर्जा वाढवते. हे पेय मळमळ आणि डोकेदुखीपासून देखील आराम देऊ शकते. थोडे आले पाण्यात उकळा. पाणी गाळून घ्या, त्यात एक चमचा मध घाला आणि कोमट झाल्यावर ते प्या.

**आवळा रस** : हँगओव्हर बरा करण्यासाठी आवळा रस खूप उपयुक्त ठरू शकतो. त्यात व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. ते यकृत स्वच्छ करण्यास मदत करते आणि थकवा कमी करते. ताज्या आवळ्यांचा रस थोड्या पाण्यात मिसळा आणि सकाळी प्या. यामुळे शरीर लवकर बरे होण्यास मदत होते.

# अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## नव वर्ष चिंतन..!

**रेती निसटे नकळत मुठीतून**
**तद्वत वर्ष जाती निघून गडे**
**समजून घेतो काळाची गती**
**त्याचे जीवन सार्थक होई गडे .**

**जो तो धावतो आहे , पण**
**दिशाहीन प्रवास नसे कामी**
**पृथ्वी गोल आहे म्हणती**
**फिरूनी येई त्याच ठिकाणी ..**

**कहाँ गये तो कही नही**
**क्या लाये तो कुछ नही**
**जन्मी आला हेला -**
**पाणी वाहता वाहता मेला**
**संतोक्ती खरी आहे की नाही? ..**

## नागपूर विद्युत लोकपालपदी भालचंद्र खंडाईत यांची निवड



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १ :
विद्युत क्षेत्रात सुमारे ३५ वर्षांचा अनुभव असणारे तसेच महावितरणचे सेवानिवृत्त संचालक भालचंद्र खंडाईत यांनी विदर्भ व मराठवाडा कार्यक्षेत्र असलेल्या नागपूर विद्युत लोकपाल पदाचा नुकताच कार्यभार स्वीकारला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने त्यांची नियुक्ती केली आहे.

भालचंद्र खंडाईत हे भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यांतील सानगडी येथील रहिवासी असून त्यांनी तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात २३ ऑगस्ट १९८९ रोजी चंद्रपूर परिमंडलातील नवरगाव वितरण केंद्रात कनिष्ठ अभियंता म्हणून विद्युत क्षेत्रातील कार्यकाळास सुरुवात केली. त्यानंतर पदोन्नतीद्वारे महावितरणचे कार्यकारी अभियंता म्हणून खंडाईत यांनी नागपूर जिल्ह्यात, अधीक्षक अभियंता व मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात काम केले आहे.

महावितरणचे नागपूर प्रादेशिक संचालक म्हणून त्यांनी प्रामुख्याने गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागासह विदर्भामध्ये नवीन वीजजोडणी व विद्युतीकरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे केली. तसेच महावितरणचे संचालक (प्रकल्प) म्हणून भालचंद्र खंडाईत यांनी राज्यभरात राज्य व केंद्र शासनाच्या विविध प्रकल्पांना व योजनांना गती दिली.

महावितरणचे संचालक म्हणून सेवानिवृत्त झाल्यानंतर भालचंद्र खंडाईत यांची विद्युत नियामक आयोगाने नागपूर विद्युत लोकपालपदी नियुक्ती केली होती. या पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर खंडाईत यांची विद्युत लोकपाल म्हणून आयोगाकडून पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे.

# किडनी प्रत्यारोपण रॅकेट भारतातच सक्रीय

### शेतकरी किडनी विक्री प्रकरणात चंद्रपूर पोलिसांचे यश






■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १ :
चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी किडनी विक्री प्रकरणी कंबोडीया नंतर आता भारतातच दिल्ली येथील डॉ. डॉ. रविंद्रपाल सिंग व तामिळनाडू राज्यातील त्रिची येथील स्टॉर किम्स हॉस्पीटलचे संचालक डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी यांच्याकडू किडनी प्रत्यारोपण करण्यात आल्याची धक्कादायक बाब पोलिस तपासात समोर आल्याने विदेशासह देशातही लाखो रुपयाच्या मोबदल्यात किडणी विक्रीचे रॅकेट असल्याचे स्पष्ट झाले आहे.

चंद्रपूर पोलिसांनी अवघ्या काही दिवसातच या प्रकरणात राज्याच्या बाहेर तसेच कंबोडीया नंतर देशातील किडनी रॅकेट शोधून आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणात दिल्ली येथील डॉक्टरला अटक केली असून त्रिची येथील डॉक्टरला अटक करण्याचे प्रयत्न सुरु आहे. किडनी विक्री प्रकरणात तपासात देशातील मोठे हॉस्पीटलमधील डॉक्टरांचा समावेश असल्याची शक्यता असल्याने येत्या काळात केंद्रीय स्तरावर तपास करण्याची शक्यता आहे. अशी माहिती जिल्हा पोलिस अधिक्षक मुमक्का सुदर्शन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नागभिड तालुक्यातील ३६ वर्षीय इसमाने व्याजाने पैसे घेवून मोठ्या प्रमाणावर सावकारांना व्याजाची रक्कम दिल्यासंदर्भात केलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे दाखल गुन्हयाचे गांभीर्य पाहता सदर गुन्हयाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

फिर्यादी यांची किडनी प्रत्यार्पण संबंधाने सदर गुन्हयात अन्य कलम समाविष्ट करण्यात आले होते व सावकारांना अटक करण्यात आली होते.

पिडीत शेतकऱ्याने किडनी प्रत्यार्पण संदर्भात दिलेल्या माहितीवरुन कंबोडिया जाऊन किडनी प्रत्यार्पित केली होती असे सांगितले होते, सदर प्रकरणात क्रिष्णा उर्फ रामकृष्ण सुंचु व हिमांशु भारव्दाज यांना अटक करण्यात आली होती.

त्यांचेकडे केलेल्या तपासात व तांत्रीक विश्लेषन केल्यावर या किडनी प्रत्यार्पण रॅकेट मध्ये भारतातील कनेक्शन निष्पन्न होत आहे.

फिर्यादी रोशन कुडे व त्याचे इतर साथीदार यांना कंबोडिया येथे घेवुन जाणारा हिमांशु भारव्दाज याने सुध्दा जुलै २०२२ मध्ये आर्थिक अडचणी मुळे स्वतःची किडनी क्रिष्णा उर्फ रामकृष्ण सुंचू याचेमार्फत त्रिची राज्य तामीळनाडु येथील स्टॉर किम्स हॉस्पीटलचे संचालक डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी व दिल्ली येथील डॉ. रविंद्रपाल सिंग यांनी अवैधरित्या किडनी प्रत्यार्पण प्रक्रिया केली आहे.

प्राथमिक तपासात, किडनी घेणारे व्यक्तीकडून ५० लाख ते ८० लाख रु. पर्यंत रक्कम घेवुन डॉ. रविंद्रपाल सिंग दिल्ली यास १० लाख रु., स्टॉर किम्स हॉस्पीटल चे संचालक डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी यांना सर्जरी व हॉस्पीटीलीटी उपलब्ध करुन देण्यासाठी २० लाख रु. तसेच क्रिष्णा उर्फ





रामकृष्ण सुंचू यास व इतर लोकांना २० लाख रु. मिळत होते. किडनी देणाऱ्या व्यक्तीस फक्त ५ ते ८ लाख रु. देत होते.

सदर गुन्हयाचे तपासात, स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथील पथक स्टॉर किम्स हॉस्पीटल त्रिची (तामिळनाडु) येथे गेले असुन हॉस्पीटल संचालक डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी याचा शोध घेवुन त्याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरु आहे.

आणखी एक स्थानिक गुन्हे शाखा पथकाने दिल्ली येथे डॉ. रविंद्रपाल सिंग यांना ताब्यात घेतले होते, त्यांना ट्रॉन्झीट रिमांड कामी दिल्ली येथील संबंधीत यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यास दिनांक २ जानेवारी रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी चंद्रपूर यांचे समक्ष प्रत्यक्ष हजर राहणे बाबत आदेश दिले असून, त्याबाबत पुढील तपास करण्यात येत आहे.

सदर किडनी रॅकेट मध्ये आतापर्यंत कंबोडिया येथील कनेक्शन फियार्दीचे रिपोर्ट प्रमाणे आले होते. त्यानंतरच्या तपासात चंद्रपूर पोलीसांच्या अथक परिश्रमामुळे भारतातील नामांकित हॉस्पीटल्स, बरेच डॉक्टर्स आणि एजंट याचा मोठा किडनी प्रत्यारोपण घोटाळा उघडकीस आणण्यास यश प्राप्त झालेले आहे.

## दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत जिल्हास्तरावर आढावा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई/नागपूर, दि. १ :
दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रदान करण्यात आलेल्या हक्कांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर सविस्तर आढावा बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले, जिल्हा कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रश्न व तक्रारी ऐकून त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या उपाध्यक्षतेखाली विशेष बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या तक्रारी, त्यावर घेण्यात आलेले निर्णय तसेच करण्यात आलेली कार्यवाही यांचा सविस्तर अहवाल आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच शासनास सादर करण्यात येणार आहे. बैठकी दरम्यान शासनस्तरावर निर्णय किंवा कार्यवाही आवश्यक असलेल्या मुद्द्यांसाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करून



तो शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर निर्णय घेण्यास मदत होणार आहे.

दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक गरजांचा विचार करून सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सहकार्याने विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांमधून आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला व आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध होणार असून, या उपक्रमांमुळे दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मार्गी लागतील, असे सचिव मुंढे यांनी सांगितले.

## सर्वच बंडोबांना थंड करू...

### चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला विश्वास



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर/मुंबई, दि. १ :
मुंबईसह राज्यभरातील महापालिका निवडणुकीत भाजपच्या ज्या नेत्यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, ते सर्वजण लवकरच आपले उमेदवारी अर्ज मागे घेतील, असा ठाम विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. ते आज पत्रकारांशी बोलत होते.

मुंबईसह राज्यभरातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा कार्यक्रम सध्या सुरू आहे. त्यात सर्वच पक्षांमध्ये मोठी बंडखोरी झाली आहे. विशेषतः सत्ताधारी भाजपमध्ये जागा कमी व इच्छुकांचा भरणा जास्त असल्यामुळे बंडखोरी वाढली आहे.

त्यातच भाजपमध्ये निष्ठावंतांना डावलून उपऱ्यांना संधी देण्यात आल्यामुळे मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, चंद्रपूर, अकोला, नाशिक आदी ठिकाणी मोठी बंडखोरी वाढली आहे. भाजपचे इच्छुक उमेदवार या प्रकरणी स्थानिक नेत्यांना धारेवर धरत त्यांच्याकडे जाब विचारत आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपरोक्त विश्वास व्यक्त केला आहे.

बावनकुळे म्हणाले, महापालिका निवडणुकीत अनेक ठिकाणी भाजपमध्ये बंडखोरी झाली आहे. पण भाजपच्या ज्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी महापालिका निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. ते सर्वजण आपले अर्ज मागे घेतील. भाजप आपल्या सर्व नाराज कार्यकर्त्यांशी संवाद साधेल. जे कार्यकर्ते पक्षावर काही काळापुरते नाराज झालेत ते पुन्हा पक्षाचे काम करतील.

चंद्रपूरची कारवाई योग्यच आहे. प्रदेशाध्यक्षांनी मंजूर केलेली उमेदवारांची यादी परस्पर बदलणे हे काही योग्य नाही. त्यामुळे प्रदेशाध्यक्षांनी तेथील अध्यक्षांना काढून टाकले आहे, असे ते म्हणाले. एखादा गुन्हा दाखल होणे किंवा एखाद्यावर केस रजिस्टर झाल्याने काही होत नाही. कोर्टात काय सिद्ध होते हे महत्त्वाचे असते, असेही गुन्हेगारांना तिकीट देण्याच्या मुद्यावर ते म्हणाले.

## कुरळे ब्रदर्स येणार ३० जानेवारीला!




लोकरंजन

प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे कुरळे ब्रदर्स पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर धमाल करण्यासाठी सज्ज झाले आहेत. पुन्हा एकदा साडे माडे तीन या बहुप्रतिक्षित चित्रपटाचं नवं पोस्टर नुकतंच सोशल मीडियावर झळकलं असून हा चित्रपट येत्या ३० जानेवारी २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

पोस्टर पाहाताच एक गोष्ट स्पष्ट होते ती, या वेळी गोंधळ डबल आहे आणि धमालही डबल! साध्या परिस्थितीतून मोठा गोंधळ निर्माण करणारी साडे माडे तीनची ओळख या नव्या पोस्टरमधूनही ठळकपणे जाणवते आणि प्रेक्षकांची उत्सुकता अधिकच वाढली आहे.

साडे माडे तीनचा पहिला भाग आजही प्रेक्षकांच्या आठवणीत ताजा आहे.आता तब्बल एकोणीस वर्षांनंतर, त्याच आठवणींना उजाळा देत आणि आजच्या काळाशी जुळवून घेत पुन्हा एकदा साडे माडे तीन प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्यामुळे उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

अंकुश चौधरी यांच्यासारख्या अनुभवी दिग्दर्शकाच्या हातात ही कथा पुन्हा एकदा साकारली जात असल्यामुळे, या वेळी हास्याबरोबरच कथेतली पकडही तितकीच भक्कम असणार, यांचा अंदाज येतोय.अंकुश चौधरी यांची कथा, संदीप दंडवते यांची पटकथा व संवाद लाभलेल्या या चित्रपटात अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू, संकेत पाठक, संजय नार्वेकर आणि समृद्धी केळकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

■ ■ ■

## रुबाब चित्रपटाचा धडाकेबाज टीझर प्रदर्शित




नवनवीन विषय, वेगवेगळे आशय आणि प्रेक्षकांच्या बदलत्या आवडी लक्षात घेत झी स्टुडिओज सातत्याने मराठी सिनेसृष्टीत वेगळे प्रयोग सादर करत आहे. आशयघन सामाजिक कथा, कौटुंबिक भावविश्व ते मनोरंजनप्रधान चित्रपटांपर्यंतचा प्रवास करत, आता झी स्टुडिओज प्रेक्षकांसाठी एक स्टायलिश, रुबाबदार लव्हस्टोरी घेऊन येत आहे.

रुबाब या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, पहिलीच झलक आणि तुझ्यासारखी नको.. तूच पाहिजे.. ही टॅगलाईन प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.

टीझरमधून समोर येणारी कथा ही एका डॅशिंग, रुबाबदार नायकाची आणि त्याच्या ड्रीम गर्लची आहे. मात्र ही केवळ गोडगुलाबी प्रेमकहाणी नसून, एक रूबाबदार प्रेमकहाणी आहे. प्रेमासाठी कोणतीही किंमत मोजायला तयार असलेला, स्वतःचे नियम स्वतः ठरवणाऱ्या या नायकाची प्रेमकहाणी सगळ्यांनाच जबरदस्त आवडेल हे नक्की. प्रेमकहाणीला डॅशिंग टच देत भावनांचा समतोल साधणारा हा चित्रपट तरुणाईला नक्कीच आवडेल. ■ ■

## २०२५ ने मला आयुष्याचे मोठे धडे दिले

झी मराठीवरील 'कमळी' या मालिकेतील अनिका म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला आलेली केतकी कुलकर्णी हिने २०२५ हे वर्ष तिच्यासाठी कसे होते, याबद्दल सांगितले.

केतकी म्हणते की २०२५ हे वर्ष तिच्यासाठी खूपच मिश्र अनुभवांचे होते. जानेवारी ते जुलै या काळात मी एक वेगळी व्यक्ती होते आणि जुलै ते डिसेंबरमध्ये मी पूर्णपणे बदलले. सध्या मी जी आहे ती व्यक्ती मला जास्त आवडते. २०२५ मी अनेक शिकवणींसह संपवत आहे .अशा शिकवण्या ज्या मी आयुष्यभर सोबत ठेवणार आहे. ती पुढे सांगते की काही गोष्टींसाठी ती खूप कृतज्ञ आहे, तर काही कठीण धडे आयुष्य कसे जगायचे, प्रत्येक क्षण कसा एन्जॉय करायचा, हे शिकवणारे होते.

२०२५ ने मला शिकवले की काही गोष्टी सोडून द्यायला हव्यात आणि फार जास्त ३ड्ढोल्ल३ ठेवू नये. देवावर विश्वास ठेवावा आणि सगळं काही एका कारणासाठीच घडतं, हे मान्य करावं. माझ्यासाठी २०२५ मधला सगळ्यात मोठा धडा हाच आहे. ती म्हणते, कुठल्याही गोष्टीसाठी जास्त काळ दुःखी राहण्यापेक्षा आयुष्यातल्या चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करायला हवं. हा धडा मला आयुष्यात पुढे जाण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.२०२५ मधली तिची सगळ्यात सुंदर आठवण म्हणजे कमळी या मालिकेसाठी झी मराठीसोबत काम करणे आणि अनिका ही भूमिका साकारणे. २०२५ मध्ये काही इच्छा पूर्ण न झाल्याचंही ती प्रामाणिकपणे मान्य करते. मला इंस्टाग्रामवर एक मिलियन फॉलोअर्स हवेत, ही थोडीशी सिली इच्छा होती, पण ती अजून पूर्ण झाली नाही. ■ ■



## सलमान खानच्या हस्ते मॅजिक चित्रपटाचा ट्रेलर लॉंच

अभिनेता जितेंद्र जोशीची प्रमुख भूमिका असलेल्या मॅजिक या चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. आता या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करण्यात आला असून, एन्काऊंटरचं गूढ, अत्तराच्या सुवासाचं 'मॅजिक' काय आहे, असा प्रश्न या गुंतवून ठेवणाऱ्या ट्रेलरनं निर्माण केला आहे. नुकताच सुप्रसिद्ध अभिनेता सलमान खानच्या हस्ते या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच करण्यात आला.

'आई कुठे काय करते'सारख्या उत्तमोत्तम मालिकांचं दिग्दर्शन केलेल्या रवींद्र विजया करमरकर यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. चित्रपटात जितेंद्र जोशी एन्काउंटर स्पेशलिस्टच्या प्रमुख भूमिकेत असून,सिद्धीरुपा करमरकर, जुई भागवत, प्रियांका पालकर, मयूर खांडगे, अभिजित झुंजारराव, रुपा मांगले, नितीन भजन, गुरुराज कुलकर्णी, योगेश केळकर, प्रदीप डोईफोडे, रसिकराज यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट अनेक महोत्सवांमध्ये गौरवला गेला आहे.

एन्काऊंटर स्पेशलिस्ट असलेल्या पोलिस अधिकाऱ्याने केलेला एन्काउंटर आयुष्यात घडणाऱ्या उलथापालथींची गोष्ट मॅजिक या चित्रपटात आहे. एन्काऊंटर केल्यानंतर हा पोलिस अधिकारी गावी येतो, पण एक मुलगी तिथं पोहोचते आणि मग सुरू होतो एक वेगळा खेळ... हे नेमकं प्रकरण काय आहे, उत्तरं मोठ्या पडद्यावरच मिळणार आहेत.'मॅजिक' हा चित्रपट १ जानेवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.

■ ■ ■



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## वीज कनेक्शन वेळेत मिळण्यासाठी महावितरणची नवी व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :
ग्राहकाने अर्ज केल्यानंतर महानगरांमध्ये तीन दिवसात, शहरांमध्ये सात दिवसात आणि ग्रामीण भागात १५ दिवसात नवे वीज कनेक्शन देण्याच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कालमर्यादेची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून कार्यपद्धतीत बदल केला आहे. त्यामुळे ग्राहकांना वीज कनेक्शनसाठी वाट पहावी लागणार नाही, असा विश्वास महावितरणच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

महावितरणकडून मुंबईचा काही भाग वगळता संपूर्ण राज्यात वीज पुरवठा सेवा दिली जाते. ग्राहकांना नव्या वीज कनेक्शनसाठी ऑनलाईन अर्ज करता येतो. अजासोबत दाखलेही जोडता येतात. महावितरणच्या अधिका?यांकडून अर्जाची व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर ग्राहकाला शुल्क भरण्याची सूचना दिली जाते. ग्राहकाने पैसे भरले की, नवा मीटर जोडून ग्राहकाला वीज कनेक्शन दिले जाते.

सध्याची ही पद्धती अर्ज केल्यापासून नवे कनेक्शन दिल्याची यंत्रणेत नोंद होण्यापर्यंत पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आली आहे. यामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक टप्प्यावर देखरेख करण्यात येत आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना हमखास आयोगाने ठरवून दिलेल्या कालमयार्देत नवी जोडणी मिळण्याचा विश्वास महावितरणच्या प्रशासनाला वाटतो.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महानगरांसाठी तीन दिवस, शहरांसाठी सात दिवस आणि ग्रामीण भागात १५ दिवसात कनेक्शन देण्याची तरतूद केली असली तरी ती जेथे पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, त्यासाठी ही कालमर्यादा आहे. महावितरणच्या प्रशासनाने केलेल्या सुधारणेमुळे नवीन वीज कनेक्शन देण्याच्या कामात गतीमानता येईल आणि अधिक पारदर्शकता येईल.

## गोठ्यात आढळले बिबट्याचे शावक



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. १ :
मेहकर तालुक्यात बिबटाचे कुटुंब आढळून आले. संग्रामपूर तालुक्यात बिबट्याने हल्ला करून पाच बकऱ्यांचा फडशा पाडला तर खामगाव तालुक्यात बिबट्याने एका गाईचा फडशा पाडला.

मेहकर तालुक्यातील कळमेश्वर शिवारात राजू खुरद यांचे शेत आहे. काल बुधवारी शेतात आल्यावर गोठ्यात जात असताना त्यांना गोठ्यात बिबट्याचे कुटुंबंच आढळून आले! त्यांनी आरडाओरड केल्यावर आजूबाजूच्या शेतातील शेतकरी धावून आले . यावेळी नर व मादी बिबट ने तोंडात एकेक शावक (पिल्लू) धरून पळ काढला. मात्र एक शावक गोठ्यातच राहिले. याची माहिती वन विभागाला मिळाल्यावर घटनास्थळी वन विभागाचे पथक दाखल झाले.

पथकाने बिबट्याच्या शावकाला ताब्यात घेऊन ते सुखरूप असल्याची खात्री केली. तसेच परिसरात पाहणी करून शावकाच्या आईचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम सुरु केली. मात्र संध्याकाळी उशिरापर्यंत बिबट मादीचा शोध लागला नसल्याची माहिती वन विभाग सूत्रांनी दिली आहे. दरम्यान परिसरात शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## ज्याला जे आवडते, तेच तो घेत असतो...



### अभिनेत्री स्पृहा जोशी यांचे प्रांजळ मत

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १ :
आजच्या युगात हे चांगले, ते वाईट असे ठरविता येत नाही. ज्याला जे आवडते, तेच तो घेत असतो. त्यामुळे नायकप्रधान सामाजिक चित्रपट असो, की इतर खलनायकांच्या भूमिकांना विशेष महत्त्व देणारे चित्रपट असो, त्याचा फारसा परिणाम समाजमनावर होत नाही. चित्रपटांमधून प्रेक्षक त्यांना हवा तोच बोध घेतात, त्याबाबत चिंता करण्याचे कारण नाही, असे मत प्रसिद्ध मराठी अभिनेत्री स्पृहा जोशी हिने व्यक्त केले.

यवतमाळ येथे जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात सहभागी होण्यासाठी ती आली होती. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातीले यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत स्पृहा बोलत होती. दूरचित्रवाणीला प्रेषक खूप आहेत. हे माध्यम घराघरांत पोहोचलेले आहे. त्यामुळे मालिकांनाही चांगले दिवस आहेत.

विदर्भात नाटकांचे प्रयोग होतात. नवीन वर्षात नागपूर, अमरावती आणि अकोला या शहरांमध्ये माज्या ह्लपुरुषह्ल या नाटकांचे प्रयोग होणार आहेत. यवतमाळकरांनी त्या ठिकाणी येवून ह्लपुरुषह्ल आवर्जून बघावे, असे आवहानही स्पृहा जोशी यांनी याप्रसंगी केले. नाट्यप्रयोगांबद्दल बोलताना ती म्हणाली की, जेव्हा एखाद्या शहरात नाटकांचे प्रयोग मोठ्या प्रमाणात होतात, तेव्हा त्यांना प्रेषक आपोआपच लाभत असतो. प्रयोगांसोबत प्रेषकही घडत असतात.

येथील जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयाला भेट दिल्यावर मलाही माज्या महाविद्यालयीन जीवनाची आठवण झाल्याचे तिने सांगितले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मला आनंद झाला. तरुण वय हे क्रांती करायला उत्सुक असते. त्यांना त्यांच्या वयातील लोकांनी सांगितलेले अधिक आवडते. मीही त्यांना त्यांच्या जवळची वाटते. तरुण-तरुणी हे आपल्या आई-वडिलांपेक्षा आपल्या वयाच्या ताई-दादांचे म्हणणे अधिक ऐकत असतात. मी कुणी तत्वज्ञ नाही, मोटीव्हेशनल स्पीकर नाही, परंतु त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांना माझ्या चार कविता ऐकविल्या. त्यांना आवर्जून एक गोष्ट सांगितली की, केवळ इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना मनाची कवाडं बंद करू नका, इतरही क्षेत्रात आपला ठसा उमटवा. तरुणांनी नवीन काही शिकलं पाहिजे, असा सल्ला दिल्याचे स्पृहाने सांगितले.